सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राजुराबाजार-वरुड रेल्वे क्रॉसिंगवर ई-बस व रिक्षाची भीषण धडक

## चार जणांचा दुर्दैवी मृत्यू, तिघे गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

राजुराबाजार-वरुड रेल्वे क्रॉसिंगवर आज सकाळी सुमारे १०.३० वाजता झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरून गेला. भरधाव ई-बस आणि ऑटो रिक्षामध्ये समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत रिक्षामधील चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले. जखमींपैकी एकाचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे; मात्र प्रशासनाकडून यास अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही.मृतांमध्ये एका शाळकरी विद्यार्थीनीचा समावेश असल्याने घटनेने अधिकच हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की रिक्षाचा अक्षरशः चक्काचूर झाला. धडकेनंतर रिक्षाचे लोखंडी अवशेष रस्त्यावर विखुरले होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बस वेगात असल्याने चालकाला वाहनावर नियंत्रण मिळवता आले नाही आणि रेल्वे क्रॉसिंगजवळ ही दुर्घटना घडली.घटनेची माहिती मिळताच वरुड पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने बाहेर काढण्यात आले. गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर मृतदेह वरुड ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी आणण्यात आले आहेत.या अपघातामुळे वरुड परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रेल्वे क्रॉसिंगवरील सुरक्षाव्यवस्था, वेगमर्यादा आणि वाहतूक नियंत्रणाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दरम्यान, अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला असून अपघाताचे नेमके कारण शोधले जात आहे.या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये शाळेत जाणाऱ्या एका विद्यार्थिनीचा समावेश असल्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघातातील अन्य तीन प्रवासी गंभीररित्या जखमी झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. जखमींवर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींना वाचवण्यासाठी डॉक्टर शर्थीचे प्रयत्न करत आहेत. या अपघातामुळे वरुड-राजुरा बाजार रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.



## पायलटच्या मदतीनेच अजित पवारांचा घातपात

### रोहित पवारांचा थेट आरोप, अवाजवी इंधनामुळे स्फोट; विमान अपघातावर नवे प्रश्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान दुर्घटनेत निधन झाले. मुंबईहून सभेसाठी निघालेल्या त्यांच्या विमानाने बारामती विमानतळाजवळ येताना अचानक एका बाजूला झुकत खाली कोसळल्याची माहिती समोर आली होती. विमान जमिनीवर आदळल्यानंतर मोठा स्फोट झाला आणि त्यानंतर आगीने भीषण रूप घेतले. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव, पायलट सुमीत कपूर, शांभवी पाठक आणि विमान परिचारिका पिंकी माळी यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण राज्याला मोठा धक्का बसला होता.

मात्र ही केवळ दुर्घटना नसून यामागे घातपात असू शकतो, अशी शंका राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार यांनी व्यक्त केली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी या प्रकरणी अनेक मुद्दे उपस्थित केले असून मुंबई आणि दिल्ली येथे पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली होती. आज मुंबईतील वाय बी चव्हाण सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पुन्हा एकदा हा अपघात नसून नियोजित कट असल्याचा दावा केला. पायलटच्या मदतीनेच हा घातपात घडवण्यात आला असावा, असा गंभीर आरोप त्यांनी केला.



रोहित पवार यांनी सांगितले की, अपघाताच्या ठिकाणाची पाहणी केल्यावर काही बाबी संशयास्पद वाटतात. एखादा चेंडू मऊ मातीत पडला तर कमी उसळी घेतो, पण कठीण रस्त्यावर पडला तर जास्त उड्या घेतो, असे उदाहरण देत त्यांनी सांगितले की विमान धावपट्टीवर न पडता बाजूच्या कठीण पृष्ठभागावर आदळले. त्यामुळे त्याचा धक्का अधिक तीव्र झाला. स्फोटाचे मुख्य कारण विमानातील जादा इंधन असू शकते, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

त्यांच्या मते, या विमानातील इंधन टाक्या नेहमीपेक्षा जास्त भरलेल्या होत्या. सामान्यतः अशा विमानांमध्ये प्रसाधनगृहाजवळ इंधन टाक्या असतात आणि त्याच्या जवळच उड्डाण नोंद यंत्र असते, अशी माहिती त्यांनी दिली. मुंबईहून बारामतीकडे जाताना इंधन पूर्ण क्षमतेने भरले गेले होते. मात्र बारामतीला पोहोचल्यानंतर विमान पुढे जाणार होते, तर तेथेच पूर्ण इंधन भरण्याची गरज काय होती, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी मनसे प्रमुख राज ठाकरे नंदनवनवर

### निवडणुकीनंतर राजकीय हालचालींनी खळबळ; भेटीचे कारण अस्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ मुंबई**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या नंदनवन बंगल्यावर जाऊन भेट घेतली. या भेटीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. दोन्ही नेत्यांची ही भेट अचानक ठरल्याचे सांगितले जात असले तरी तिच्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे विविध तर्कवितर्कांना सुरुवात झाली आहे.



नंदनवन बंगल्यावर झालेल्या या चर्चेत नेमके कोणते मुद्दे मांडले गेले, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र मनसे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील ही भेट राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. आगामी घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष लक्ष लागले असून, लवकरच याबाबत अधिक स्पष्टता येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या भेटीनंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना सुरुवात झाली आहे. ही केवळ सदिच्छा भेट होती की त्यामागे काही वेगळे राजकीय संकेत आहेत, याबाबत चर्चा रंगल्या आहेत. शिंदे यांनी राज ठाकरेंचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या भेटीचे छायाचित्रे समाजमाध्यमांवर वेगाने प्रसारित झाली आणि त्यानंतर चर्चांना अधिकच उधाण आले.

डिसेंबर २०२५ मध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी महापालिका निवडणुकांसाठी युतीची घोषणा केली होती. मात्र जानेवारीत जाहीर झालेल्या निकालांमध्ये या युतीला मुंबईत अपेक्षित यश मिळाले नाही. राज्यभर झालेल्या निवडणुकांमध्ये मनसेची कामगिरी सर्वात कमकुवत ठरल्याचे चित्र दिसले. गेल्या महिन्यात मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये ठाकरे बंधूंची युती विरुद्ध भाजप आणि शिंदेसेनेची महायुती अशी थेट लढत झाली होती. प्रचारादरम्यान राज ठाकरे यांनी महायुतीवर कठोर टीका केली होती. मात्र निवडणुका संपल्यानंतर मनसेने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिंदेसेनेला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. त्याचवेळी राज ठाकरे यांनी पुढील राजकीय वाटचालीत लवचिक भूमिका घेण्याचे संकेतही दिले होते.

या सर्व पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर प्रथमच राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे समोरासमोर आले. या भेटीत विविध विषयांवर चर्चा झाल्याचे शिंदेसेनेकडून सांगण्यात आले आहे. मात्र चर्चेचे नेमके मुद्दे अद्याप स्पष्ट झालेले नाहीत. त्यामुळे पुढील राजकीय घडामोडींबाबत उत्सुकता वाढली आहे. ही भेट भविष्यातील नव्या समीकरणांची सुरुवात ठरणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राहुल गांधींची धास्ती सरकारला नाही, काँग्रेसलाच

### राऊतांनी इंडिया आघाडीचे लक्तर वेशीवर टांगले, जनतेनं आघाडीला नाकारले- बन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

सरकारने नव्हे तर काँग्रेस कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांची धास्ती घेतली आहे. राहुल गांधी यांची धास्ती सोनिया गांधी यांनी घेतली आहे, भाजपला धास्ती घेण्याची काही गरज नाही. जो पर्यंत राहुल गांधी इंडिआ आघाडीचे नेतृत्व करतील तो पर्यंत काँग्रेसला आणि आघाडीला अच्छे दिन येणार नाही, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.



नवनाथ बन म्हणाले की, राहुल गांधींकडे जर नेतृत्व असेल तर आपल्याला कधीही यश मिळणार नाही हे इंडिआ आघाडीच्या सर्व नेत्यांना माहिती आहे. म्हणूनच ममता बॅनर्जी, स्टॅलीन, उद्धव ठाकरेंचे नाव पुढे केले जाते. राहुल गांधी स्व:तचे कमकुवत नेतृत्व वेळोवेळी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. २००९ पासून २०२४ पर्यत त्यांचा काहीही उपयोग झाला नाही.

नवनाथ बन म्हणाले की, राहुल गांधी यांच्या नेतृत्वात देशभरात काँग्रेस खड्ड्यात गेलेली आहे. संजय राऊत त्यांचे लांगुनचालन करत असतात. काँग्रेसला एकत्र ठेवण्याचा प्रयत्न राऊतांकडून सुरू आहे ते केवळ राज्यसभेची खासदारकी आपल्याला मिळावी म्हणून हे प्रयत्न राऊतांकडून सुरू आहे.काँग्रेस एकटी राहिली आणि एकत्र झाली तरी त्यांच्यानेतृत्वात निवडणूक जिंकता येऊ शकत नाही. कारण सपकाळांसारखे टिपू सुलतान त्यांच्याकडे बसलेले आहेत. टिपू सुलतानच्या नेतृत्वात महाराष्ट्र काँग्रेसचे काही होणार नाही.

**इंडिआ आघाडी केवळ सत्तेसाठीची**

नवनाथ बन म्हणाले की, इंडिया आघाडीचं अस्तित्व फक्त निवडणुकीपुरतंच आहे. हे सत्तेसाठी एकत्र आलेले लोकं आहेत त्यांचा काहीच अजेंडा नाही. केवळ भाजपला विरोध करण्यासाठी ही सर्व मंडळी एकत्र आली आहेत. देशभरातील जनतेने त्यांना नाकारले आहे. राऊतांनी कितीही लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला तरी ते एकत्र येऊ शकणार नाही. मविआ विधानसभेला एकत्र असताना आम्ही तुम्हाला पराभूत केले आणि बहुमत घेत सत्तेत आलो. तुम्ही ९० जागा लढले आणि २० जागा जिंकल्या, काँग्रेस, राष्ट्रवादीची हीच परिस्थिती होती.

## राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान

### शरद पवारांसह दिग्गजांची मुदत संपणार : पार्थ पवारांची वर्णी लागण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ नवी दिल्ली**

देशातील १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ रिक्त होणाऱ्या जागांसाठी भारतीय निवडणूक आयोगाने निवडणुकीचे बिगुल वाजवले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक ७ जागांचा समावेश असून, या जागांसाठी येत्या १६ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. एप्रिल २०२६ मध्ये अनेक दिग्गज सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याने ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत चुरशीची ठरणार आहे.



निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च असून ६ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल. ९ मार्चपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत देण्यात आली आहे. मतदान १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल, तर त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होऊन निकाल जाहीर केले जाणार आहेत.

**महाराष्ट्रातून कोणते सदस्य निवृत्त होणार?**

शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्ष)
डॉ. भागवत कराड (भाजप)
रामदास आठवले (रिपाइं – आठवले गट)
प्रियंका चतुर्वेदी (शिवसेना – ठाकरे गट)
रजनी पाटील (काँग्रेस)
डॉ. फौजिया खान (राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्ष)
धैर्यशील पाटील (भाजप)

**महायुतीची मजबूत स्थिती**

राज्य विधानसभेचे प्रभावी संख्याबळ सध्या २८६ इतके आहे. दोन जागा रिक्त असल्याने प्रत्यक्ष प्रभावी संख्या कमी असली तरी एका उमेदवाराला निवडून येण्यासाठी ३७ आमदारांचा कोटा आवश्यक आहे.

महायुतीकडे भाजपचे १३१, शिंदेसेनेचे ५७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ४० असे मिळून २२८ आमदार आहेत. याशिवाय सात अपक्ष किंवा लहान पक्षीय आमदारांचा पाठिंबा मिळून हे संख्याबळ २३५ पर्यंत पोहोचते. या आकड्यांच्या आधारावर महायुतीचे किमान सहा उमेदवार सहजपणे निवडून येऊ शकतात, असे स्पष्ट होत आहे.

राजकीय वर्तुळात भाजप चार जागा लढवेल, तर शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांना प्रत्येकी एक जागा मिळू शकते, अशी चर्चा रंगली आहे.

**पार्थ पवार रिंगणात उतरण्याची शक्यता**

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या आहेत. त्यामुळे त्यांची राज्यसभेची जागा रिक्त झालेली आहे. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून पार्थ पवार यांना संधी मिळण्याची शक्यता सूत्रांकडून व्यक्त होत आहे. अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी उमेदवारी अर्ज प्रक्रियेपूर्वी राजकीय घडामोडींना वेग येण्याची चिन्हे आहेत.

**मविआसमोर एका जागेसाठी पेच?**

विरोधी महाविकास आघाडीचे संख्याबळ मर्यादित आहे. शरद पवार गटाचे १०, काँग्रेसचे १६ आणि उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेचे २० असे मिळून ४६ आमदार आहेत. माकप आणि शेकापचे प्रत्येकी एक आमदार असल्याने एकूण संख्या ४८ पर्यंत जाते.

३७ मतांचा कोटा पूर्ण करून मविआचा एक उमेदवार निश्चित जिंकू शकतो; मात्र त्यानंतर उर्वरित मते अपुरी पडतात. समाजवादी पक्षाचे दोन आणि एमआयएमचा एक आमदार पाठिंबा देईल, तर एकूण १४ अतिरिक्त मते उपलब्ध होऊ शकतात; तरीही दुसरी जागा मिळविणे कठीण मानले जात आहे. त्यामुळे मविआकडून एकच उमेदवार उभा राहण्याची शक्यता अधिक आहे. त्या एका जागेसाठी ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यात समन्वय साधणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**या राज्यांमध्येही होणार निवडणूक**

महाराष्ट्राव्यतिरिक्त ओडिसा (३), तामिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) या राज्यांमध्येही राज्यसभेच्या निवडणुका होणार आहेत.

## मेळघाटवरील ऐतिहासिक अन्यायाविरुद्ध बच्चू कडू यांची संघर्षयात्रा

### १ ते ९ मार्च : सलोना ते चिखलदरा 'कर्जमुक्ती स्मरण यात्रा'; ९ मार्चला महामोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

मेळघाटवरील ऐतिहासिक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आमदार बच्चू कडू यांनी १ मार्च ते ९ मार्चदरम्यान 'कर्जमुक्तीची आठवण व मेळघाट संघर्ष यात्रा' आयोजित केली आहे. ही यात्रा सलोना येथून प्रारंभ होऊन चिखलदरा येथे समारोप होणार असून, ९ मार्च रोजी भव्य महामोर्चा काढण्यात येणार आहे.

मेळघाटातील शेतकरी, आदिवासी व वंचित घटकांना न्याय मिळावा, कर्जमाफीच्या आश्वासनांची पूर्तता व्हावी तसेच विकासकामांबाबत शासनाने ठोस भूमिका घ्यावी, या मागण्यांसाठी ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे. मार्गातील विविध गावांमध्ये सभा, संवाद आणि जनजागृती कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

संघर्ष यात्रेद्वारे मेळघाटातील पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण व रोजगाराच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ९ मार्च रोजी चिखलदरा येथे होणाऱ्या महामोर्चात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



मेळघाटातील शेतकरी, आदिवासी व वंचित घटकांना न्याय मिळावा, कर्जमाफीच्या आश्वासनांची पूर्तता व्हावी तसेच विकासकामांबाबत शासनाने ठोस भूमिका घ्यावी, या मागण्यांसाठी ही यात्रा काढण्यात येणार असल्याचे बच्चू कडू यांनी आज पत्रकार परिषदेदरम्यान सांगितले.

यावेळी बच्चू कडू यांनी काही मागण्या हि सरकारपुढे ठेवल्यात ज्यामध्ये मेळघाट व दुर्गम भागातील नागरिकांनी विविध मूलभूत प्रश्नांवर ठोस निर्णयांची मागणी करत शासनासमोर व्यापक मागण्यांचे निवेदन मांडले आहे. शेतकरी कर्जमाफी १५ मार्च २०२६ पूर्वी जाहीर करावी व चालू वर्षातील दुष्काळग्रस्तांना तत्काळ दिलासा द्यावा, अशी प्रमुख मागणी आहे. शेतीची पेरणी ते कापणीपर्यंतची सर्व कामे मनरेगा (जी राम जी) व आदिवासी विभागातून समाविष्ट करावीत, तसेच १०० दिवसांऐवजी २०० दिवस रोजगार द्यावा, मजुरी आठवड्याभरात खात्यात जमा करावी, अशी मागणी आहे.चिखलदरा येथे सुरू होणाऱ्या स्कॉय-वॉकला भगवान बिरसा मुंडा यांचे नाव द्यावे, चुर्णी स्वतंत्र तालुका करावा, तसेच चिखलदरा-धारणीसाठी स्वतंत्र मतदारसंघ जाहीर करावा, अशी मागणी पुढे आली आहे. वनपट्टे, ७/१२ उतारे नियमित करून शेतकऱ्यांना हक्क द्यावेत, घरकुल अनुदानात वाढ करावी, तसेच विवाह सहाय्य, महिलांसाठी सक्षमीकरण योजना राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.वन्यप्राणी हल्ल्यांबाबत कठोर धोरण आखून मृत्यू झाल्यास ५० लाखांची नुकसानभरपाई व कुटुंबातील सदस्याला नोकरी द्यावी, अशी ठाम भूमिका आहे. आरोग्य विभागात तज्ज्ञ डॉक्टरांची पदे भरून एअर म्ब्युलन्स, १०८ सेवा वाढवावी. शिक्षण क्षेत्रात रिक्त शिक्षक पदे भरून पोषक आहार, निवासव्यवस्था व भेदभावमुक्त शिक्षण द्यावे.वीजपुरवठा नियमित करणे, सौर कृषिपंप दुरुस्ती, पाणीटंचाई निवारण, लिफ्ट सिंचन, रस्ते व पूल बांधकाम, लहान बससेवा सुरू करणे, बाजार समिती स्थापन करणे आदी मागण्या मांडण्यात आल्या आहेत. एकूणच, मेळघाटच्या भौगोलिक व सामाजिक वैशिष्ट्यांचा विचार करून स्वतंत्र व दीर्घकालीन विकास धोरण जाहीर करावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.या व्यतिरिक्त आणखी काही मागण्या असल्याचे बच्चूकडू म्हणालेत.

## संपादकीय ......

# 'एआय'चे उघडले द्वार!

*कृत्रिम बुद्धिमत्ता तथा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) म्हणजे विज्ञानकथेतील कल्पना नव्हे, तर आपल्या वर्तमानाचे आणि भविष्याचे नवे वास्तव आहे. मानवाच्या बुद्धीची निर्मिती असलेले 'एआय' आज सर्जनशीलतेपासून अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक क्षेत्राला नवे वळण देत आहे. या बदलत्या युगाच्या उंबरठ्यावर उभा असलेला भारत, संधी आणि जबाबदारी या दोन्हींचा समतोल साधण्याच्या निर्णायक टप्प्यावर आहे. राजधानी दिल्लीतील भारत मंडपममध्ये इंडिया 'एआय इम्पॅक्ट समिट'चा आरंभ झाला असून, ही परिषद ऐतिहासिकच मानावी लागेल. विकसनशील देशात भरवली जाणारी ही पहिलीच परिषद असून, त्यामुळे या क्षेत्रातील भारताच्या प्रज्ञेचे दर्शन जगाला होत असून, जगाची या क्षेत्रातील प्रगतीही भारतास बघायला मिळत आहे.*

*एआय परिवर्तनात भारत जगामध्ये आघाडीवर आहे. या क्षेत्रातील भारताची प्रगती म्हणजे महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी या दोन्ही गोष्टींचे प्रतिबिंब आहे. मजबूत डिजिटल व्यवस्था, चैतन्यशील स्टार्टअप परिसंस्था आणि अत्याधुनिक संशोधन यांच्या बळावर भारत या क्षेत्राचे नेतृत्व करत आहे, असे सार्थ उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. जागतिक एआय व्यवस्थापन आणि सहकार्यासाठी समान आराखडा जाहीर करणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. त्याचवेळी रोजगारावर होणारा परिणाम, बालसुरक्षा, नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर या क्षेत्रातील अनेक नामवंत परिषदेत विचारविनिमय करतील. जगातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, विद्यापीठे व संशोधन संस्था या परिषदेत सहभागी झाल्या असून, थेट प्रात्यक्षिकेही सादर केली जात आहेत. त्यामुळे ही परिषद तसेच भरवण्यात आलेल्या 'एआय एक्स्पो'मुळे एक नवे तंत्रस्नेही वातावरण तयार होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दुहेरी तलवार असल्याचे मानले जाते. यातील धोके कमी करून संधींचा अधिकाधिक फायदा घेण्यावर भारत सरकारचा भर आहे; मात्र मुलांचा विकास, मानसिक आरोग्य आणि शिक्षण यावर एआय साधनांचा काय परिणाम होतो, हे समजून घेण्यासाठी अधिक पुराव्यांची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. यावर नक्कीच अधिक संशोधन व्हायला हवे.*

*भारतात एआयची कौशल्ये विपुल आहेत. कल्पकतेला वाव देण्यासाठी अतिनियमन न करण्याचे सरकारचे धोरण आहे. शक्य तितक्या किफायतशीर दरांमध्ये जीपीयू म्हणजेच ग्राफिक प्रोसेसिंग युनिट उपलब्ध करून देण्याची खबरदारी घेण्यात आली आहे, ही चांगली बाब आहे. या पार्श्वभूमीवर एआय हा भारतासाठी धोका नसून, ती सुसंधीच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात, त्यासाठी सुस्पष्ट धोरणे आणि व्यापक कौशल्य विकासाच्या सोयी-सुविधांची आवश्यकता आहे. नजीकच्या काळात त्या निर्माण करण्याचे आव्हान असेल. खासगी व शैक्षणिक क्षेत्र व धोरणकर्त्यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक असल्याचे अचूक प्रतिपादन भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. नागेश्वरन यांनी यासंदर्भाने करत त्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शैक्षणिक सुधारणेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीसाठी एआयचा स्वीकार करून, भारत जगाचे नेतृत्व करू शकतो, हे त्यांचे मत विचार करण्यासारखे आहे. भारतातील रोजगारक्षम व्यक्तींची संख्या मोठी आहे; परंतु त्यांना नोकऱ्या नाहीत. म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास आपोआप होऊ देण्याऐवजी तो व्यापक रोजगारनिर्मितीशी संलग्न करणे गरजेचेच आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेला माणसाने जन्म दिला असला, तरी कालांतराने एआय माणसावर राज्य गाजवेल, अशी भीती बऱ्याच काळापासून व्यक्त केली जात आहे. आता एआय हे केवळ आदेश पाळण्यापुरते मर्यादित न राहता स्वतः विचार करू शकणारे एक तंत्रज्ञान आहे. एआयमुळे पारंपरिक कौशल्ये व त्यावर आधारित रोजगार कालबाह्य ठरू शकतील; परंतु त्यामुळे हे सर्व रोजगारच नष्ट होतील, असे नाही. त्याऐवजी कामांचे स्वरूप बदलेल आणि त्यातून नवीन संधी निर्माण होतील.केंद्र सरकारने संगणकीय पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १० हजार ३७२ कोटी रुपयांचा कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यक्रम यापूर्वीच लाँच केला आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या उद्योग व्यावसायिकांना त्यांच्या डेटा सेंटरचे रूपांतर कॉम्प्युटर युनिटस्मध्ये करण्यासाठी वेगवेगळी प्रोत्साहने दिली जाणार आहेत. कॉम्प्युटर युनिटस्च्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एकीकडे माहिती किंवा डेटा असेल आणि दुसऱ्या बाजूला त्यामधून कत्रिम बुद्धिमत्तेची निर्मिती होईल. शिवाय भारतात मुळातच बुद्धिमानांची संख्या मोठी आहे. देशात या क्षेत्रात सार्वजनिक आणि खासगी कंपनीची भागीदारी केली जात आहे. आता मोठ्या प्रमाणात माहितीचे संकलन, आकडेवारीचे गणन-विश्लेषण, तिचा अन्वयार्थ लावणे याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शेकडो सेंटर प्रोसेसिंग युनिटस् (सीपीयू) जगावर अधिराज्य गाजवू शकतात. हा पायाभूत आधार असला, तरी वास्तवाकडेही पाहावे लागेल. संशोधन आणि विकास क्षेत्रातील भारताची प्रगती समाधानकारक नाही. आज संशोधनात भारताचा वाटा दोन टक्केदेखील नाही. उलट चीन आणि अमेरिकेचा तो अनुक्रमे ५८ टक्के व ५९ टक्के आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत संशोधनावरील भारताचा खर्च एक टक्कादेखील नाही. अमेरिका आणि चीनचा तो साडेचार टक्के आहे. हा खर्च हे देश मुख्यतः संशोधनविषयक पायाभूत सुविधांवर करतात. एआयच्या तंत्रज्ञानात जो श्रेष्ठ, तो जगावर राज्य करील, असे रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी म्हटले होते. २२ आणि २३ फेबुवारी रोजी मुंबईत जागतिक कृषी एआय परिषद भरत आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी, यासाठी महाराष्ट्र सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. अन्य राज्यांनीही याच दिशेने पावले टाकली पाहिजेत. केंद्र आणि राज्य यांच्या सहकार्यातून एआयबाबत देशात नवी क्रांती होऊ शकते. जगाचे लक्ष भारताकडे आहे. विशेषत: भारताच्या विशाल बाजारपेठेकडे आहे. या संधीचा जगाच्या स्पर्धेत राहताना पुरेपूर फायदा करून घ्यावा लागेल.*

## शिवजयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे

# विशेष व्याख्यान आणि भव्य बाईक रॅलीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती,** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अमरावती जिल्हा प्रशासनाच्या वतीने १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी शहरात विविध सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने या सोहळ्याचे आयोजन केले असून, शिवरायांची विचारधारा आणि व्यवस्थापन कौशल्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा मानस व्यक्त केला आहे. कार्यक्रमाची सुरुवात बुधवारी, दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे होणाऱ्या व्याख्यानाने होईल. यावेळी 'शिवश्री' प्रा. प्रेमकुमार बोके



आणि प्रा. डॉ. वैभव मस्के हे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व, त्यांचे शौर्य आणि आजही सुसंगत असलेली त्यांची विचारधारा या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. शिवजयंतीच्या दिवशी, म्हणजे १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता भीमटेकडी येथून भव्य बाईक रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली यशोदा नगर चौक, कल्याण नगर चौक, राजापेठ उड्डाणपूल, राजकमल चौक, श्याम चौक, जयस्तंभ चौक, चित्रा चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अशा मुख्य मार्गावरून जात शिवटेकडी येथील शिवाजी महाराज पुतळ्यापाशी विसर्जित होईल. या रॅलीचे खास आकर्षण म्हणजे मार्गातील ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. राजकमल चौक, इर्विन चौक आणि माँ जिजाऊ पुतळा परिसर येथे शिवरायांच्या जीवनावर आधारित पथनाट्य सादर केले जाणार आहे. तसेच माँ जिजाऊंच्या पुतळयाजवळ वीररसातील पोवाड्याचे सादरीकरण करून शिवरायांना मानवंदना दिली जाईल. या सर्व कार्यक्रमांमध्ये अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तहसिलदार विजय लोखंडे यांनी केले आहे.


# चाळिशी ओलांडल्यानंतर सार्कोपेनियाची समस्या

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

चाळिशी ओलांडल्यानंतर अनेकदा जिने चढताना दम लागणे किंवा जड पिशव्या उचलताना त्रास होणे अशा समस्या जाणवू लागतात. या कमकुवतपणाचे मुख्य कारण म्हणजे 'सार्कोपेनिया'



सार्कोपेनिया म्हणजे वयानुसार स्नायूंचे वस्तुमान आणि त्यांची शक्ती कमी होणे. ही प्रक्रिया अत्यंत संथ आणि छुपी असते, त्यामुळे अनेकदा त्याचे गांभीर्य लक्षात येत नाही. विज्ञानानुसार वयाच्या ३० ते ४० वर्षांच्या दरम्यान स्नायूंचा ऱ्हास होण्यास सुरुवात होते. दर दशकामध्ये शरीरातील सुमारे ३ ते ८ टक्के स्नायू कमी होतात.




दिवसभर हालचाल कमी असणे, आहारात प्रथिनांचे प्रमाण कमी असणे, मानसिक ताण किंवा अति वजनामुळे शरीरात होणारी अंतर्गत जळजळ ही याची कारणे आहेत. वयाच्या पन्नाशीनंतर ही प्रक्रिया अधिक वेगाने वाढते, ज्यामुळे हाताची पकड कमकुवत होणे, चालण्याचा वेग मंदावणे आणि तोल जाऊन पडण्याच्या घटना वाढू लागतात. भारतीय आहारामध्ये कर्बोदकांचे प्रमाण जास्त आणि प्रथिनांचे प्रमाण कमी असल्याने, विशेषतः शहरातील डेस्क जॉब करणाऱ्या व्यक्तींमध्ये ही समस्या लवकर दिसून येते. आजच्या जीवनात तासनतास बसून राहिल्यामुळे स्नायूंना मिळणारे संकेत कमी होतात. अपुरी झोप आणि जेवण वेळेवर न घेतल्यामुळे रात्रीच्या वेळी स्नायूंची होणारी दुरुस्ती थांबते. भारतात आढळणारी जीवनसत्त्व 'डी'ची कमतरता आणि मधुमेह यांसारख्या आजारांमुळे स्नायूंच्या ऱ्हासाची गती वाढते. 'क्लीव्हलँड क्लिनिक'च्या अभ्यासानुसार, जर तुम्ही प्रतिकार व्यायाम केला नाही किंवा प्रत्येक जेवणात २० ते ३० ग्रॅम प्रथिने घेतली नाहीत, तर सार्कोपेनियाचा धोका अधिक बळावतो. स्नायूंची ताकद टिकवून ठेवण्यासाठी आठवड्यातून किमान दोनदा खालील व्यायाम फायदेशीर ठरते:

**हाफ वॉल स्कॅटस्:** भिंतीला पाठ लावून उभे राहा आणि गुडघ्यात वाकून खाली बसा (खुर्चीवर बसल्याप्रमाणे) आणि पुन्हा वर या.

**वॉल प्रेसेस :** भिंतीसमोर उभे राहून हाताचे तळवे भिंतीवर खांद्याच्या रेषेत ठेवा. कोपर वाकवून छाती भिंतीजवळ न्या आणि पुन्हा मागे ढकला. यामुळे छाती आणि खांद्याचे स्नायू मजबूत होतात.

# २० फेब्रुवारीपासून राज्यस्तरीय खादी प्रदर्शन व महोत्सव

## खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय (भारत सरकार) यांच्यामार्फत २० फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत राज्यस्तरीय खादी प्रदर्शन स्थानिक गाडगे नगर, वलगाव रोड येथील संत गाडगे बाबा समाधी स्थळ यात्री मैदान येथे होईल. खादी आणि ग्रामोद्योग आयोग ही वैधानिक संस्था असून, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे आणि लोकांना स्वावलंबी बनवणे हे




आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे. 'व्होकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भरभारत' हे स्वप्न साकार करण्यासाठी दरवर्षी अशा प्रदर्शनांचे आयोजन केले जाते.विभागीय कार्यालय, नागपूर यांच्या माध्यमातून आयोजित या प्रदर्शनात देशभरातील विविध खादी संस्था, स्फुर्ती क्लस्टर आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत स्थापित लघु उद्योगांची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. विदर्भातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन खादी वस्त्रे व ग्रामोद्योग उत्पादने खरेदी करावीत, जेणेकरून स्वदेशी उद्योजकांचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत होईल, असे आवाहन आयोगामार्फत करण्यात आले आहे.

# कर्जमाफीसाठी अपूर्ण माहिती असलेल्या शेतकऱ्यांची यादी जाहीर; नाव कसे तपासायचे? कागदपत्रे कुठे जमा करायची?

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

शासन स्तरावर प्रस्तावित असलेल्या 'शेतकरी कर्जनिवारण योजना २०२६' च्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. मात्र, अनेक थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती अपूर्ण असल्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर, संबंधित शेतकऱ्यांनी आपली माहिती त्वरित बँकेत जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




**माहिती अभावी पोर्टलवर नोंदणी रखडली**

सध्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. परंतु, अनेक शेतकऱ्यांचे:

आधार कार्ड क्रमांक
बचत खाते क्रमांक
मोबाईल नंबर

ही महत्त्वाची माहिती उपलब्ध नसल्यामुळे योजनेच्या अधिकृत पोर्टलवर त्यांची नावे नोंदवणे शक्य होत नाहीये. तसेच, अनेक कर्जदार शेतकरी मयत झाले आहेत किंवा गाव सोडून स्थलांतरित झाले आहेत, ज्यामुळे त्यांच्या खात्यांची माहिती अद्ययावत करण्यात अडचणी येत आहेत.

**याद्या कुठे उपलब्ध आहेत?**

ज्या शेतकऱ्यांची माहिती अपूर्ण आहे, त्यांच्या नावाच्या याद्या खालील ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत:

नजीकची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा.
गावातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था.
ग्रामपंचायत कार्यालय.
पंचायत समिती व तहसील कार्यालय.
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालय.

विभागीय सहनिबंधकांनी स्पष्ट केले आहे की, जे कर्जदार शेतकरी मयत झाले आहेत, त्यांच्या वारसांनी बँकेच्या शाखेशी संपर्क साधून वारस नोंदीसाठी आवश्यक कागदपत्रे जमा करावीत. जेणेकरून संबंधित कुटुंबाला योजनेचा लाभ मिळू शकेल.

# चांदूर रेल्वेत नाफेडद्वारे तूर खरेदीचा शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे खरेदी-विक्री संघाच्या वतीने सोमवारी (ता. १६) नाफेडद्वारे हमीभावने तूर खरेदीचा शुभारंभ स्थानिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या गोडाऊनमध्ये करण्यात आला. यावेळी मालखेड येथील शेतकरी प्रभाकर इखार यांच्या तूर शेतमालाची खरेदी करून हमीभाव ८ हजार रुपये प्रति क्विंटल ने तूर खरेदी करण्यात आली आणि शेतकऱ्याचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती गणेश आरेकर, खरेदी विक्री समितीचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख, उपाध्यक्ष पंकज शिंदे, मानस सचिव अशोक चौधरी, प्रवीण चिंचे, नितीन कोपरकर पवन चौधरी, दिनेश ठाकरे, संजय डुकरे, सुरेंद्र नेरकर, सुनिल गावंडे, सतिश धरमकेले, गजानन घुरडे, प्रेमदास रामटेके, सविता गावंडे, सरिता देशमुख, सुधीर नलगे, हरिभाऊ ठाकरे यांच्यासह संचालक मंडळ तसेच ग्रेडर मनिष टेकाडे व कर्मचारी उपस्थित होते.

## अमरावतीचे नाव दिल्लीत गाजणार!

# डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख यांना मानाचा 'जिजाबाई अचिव्हर्स अवॉर्ड' जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था संचलित, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता रावसाहेब देशमुख यांना दिल्ली विद्यापीठाच्या प्रतिष्ठित शिवाजी कॉलेजतर्फे दिला जाणारा 'जिजाबाई अचिव्हर्स अवॉर्ड २०२५-२६' जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे बहुमूल्य योगदान आणि सांस्कृतिक दूत म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा गौरव शिवजयंतीच्या निमित्ताने करण्यात येत आहे. राजमाता जिजाऊंच्या प्रेरणेतून २०१० मध्ये सुरू करण्यात आलेला हा पुरस्कार शिक्षण, क्रीडा, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रांत क्रांती घडवून आणणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. डॉ. स्मिता देशमुख यांनी शैक्षणिक क्षेत्रात राखून ठेवलेली



नैतिकता, अखंडता आणि नागरी जबाबदारीचे भान या गुणांची समितीने विशेष प्रशंसा केली आहे.शिवाजी कॉलेजचे प्राचार्य प्रो. वीरेंद्र भारद्वाज आणि 'विमेन डेव्हलपमेंट सेल'च्या निमंत्रक डॉ. सुनीता सिंग यांनी या निवडीबद्दल आनंद व्यक्त केला आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या भव्य सोहळ्यात डॉ. देशमुख यांच्या कार्यावर आधारित एका लघुपटाचे सादरीकरण देखील केले जाणार आहे. पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये रोख सन्मानचिन्ह असे राहील.अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरणाराहा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, संपूर्ण अमरावती शहराच्या आणि शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे. डॉ. स्मिता देशमुख यांच्या या यशामुळे सर्वच स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मारडा शेतशिवारातील पांधन रस्ता पाण्याखाली आठ दिवसांत तोडगा न निघाल्यास उपोषणाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८तिवसा**

मारडा (ता. तिवसा) येथील शेतशिवारात मुख्य कालव्याचे पाणी साचल्यामुळे वऱ्हा, घोटा व मारडा या पांधन रस्त्यावर तीन ते चार फूट पाणी साचले असून शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याचा मार्ग पूर्णतः बंद झाला आहे. गेल्या तीन वर्षांपासून हीच परिस्थिती कायम असल्याने परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहेत.या रस्त्यावरून सुमारे ३५ ते ४० शेतकऱ्यांची ये-जा होत असून सुमारे ४०० ते ५०० एकर शेतीसाठी हा मुख्य मार्ग आहे. मात्र कालव्याचे वेस्टेज पाणी रस्त्यावर साचत असल्याने शेकडो हेक्टरवरील पिके शेतातच पडून राहिली आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.



याबाबत वारंवार उर्ध्व वर्धा कालवे विभाग दोनच्या उपअभियंत्यांना निवेदने देण्यात आली, मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

दरम्यान, मारडा येथील शेतकरी व शेतकरी न्याय हक्क विचार मंचचे अध्यक्ष दिनेश वानखडे यांनी उपविभागीय अभियंता यांना निवेदन देऊन आठ दिवसांच्या आत कालव्याचे वेस्टेज पाणी बंद न केल्यास शेतकऱ्यांसह स्वतः उपोषणास बसणार असल्याचा इशारा दिला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी येत्या आठ दिवसांत पाणी पूर्णतः बंद करण्याचे आश्वासन निवेदनकर्त्या शेतकऱ्यांना दिले आहे.निवेदन देताना शेतकरी न्याय हक्क विचार मंचाचे दिनेश वानखडे, नंदूभाऊ जीरापुरे, राजू भुसारे, सौरभ भुसाटे, स्वप्नील आसोले, ज्ञानेश्वर आसोले, लक्ष्मण भुसारे, माधव वासुदे, सुनिल जिरापुरे, अभय अवघड, अशोक पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# मेळघाटात महिला डॉक्टरचा मानसिक छळ

## अखेर राजीनामा, बैरागड प्राथमिक आरोग्य यंत्रणेवर धक्कादायक आरोप

### धारणीसह जिल्ह्याच्या आरोग्य विभागात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

धारणी तालुक्यातील बैरागड अंतर्गत चटवाबोड येथील आयुर्वेदिक दवाखान्यात कार्यरत असलेल्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्याने सातत्यपूर्ण मानसिक, प्रशासकीय व सामाजिक छळाला कंटाळून थेट राजीनामा दिल्याने जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेत मोठी खळबळ उडाली आहे. आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी (गट–ब) डॉ. शिल्पा राजीव वानखडे यांनी आपल्याच वरिष्ठ व संबंधित कर्मचाऱ्यांकडून अमानवी वर्तन होत असल्याचा गंभीर आरोप करत जिल्हा परिषद अमरावती यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे राजीनामा सादर केला आहे. डॉ. वानखडे या १ जुलै २०२५ रोजी रुजू झाल्यापासून प्राथमिक आरोग्य केंद्र, बैरागड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. धम्मदीप भगत यांच्याकडून सातत्याने मानसिक व प्रशासकीय छळ केला जात




असल्याचे त्यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे. रुजू झाल्यानंतरही त्यांच्या मूळ नेमणुकीच्या आयुर्वेदिक दवाखान्याचा ताबा आजतागायत देण्यात आला नाही. उलट, पदाशी विसंगत व मर्जीतील कामे करण्यास त्यांना भाग पाडण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या सर्व परिस्थितीतही आदिवासी व दुर्गम भागातील रुग्णांना आयुर्वेदिक ओपीडीद्वारे सेवा देण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. मात्र, डॉ. भगत यांच्या विश्वासातील आरोग्य सेविका कविता कोहळेकर यांनी आयुर्वेदिक दवाखान्यात स्वतःचा संसार थाटल्याने वैद्यकीय सेवा देणे अशक्य झाले. त्या व त्यांच्या पतीकडून सातत्याने अपमानास्पद वर्तन, मानसिक त्रास तसेच चारचाकी वाहनाचे वारंवार हॉर्न वाजवून त्रस्त केल्याचेही अर्जात नमूद आहे. इतकेच नव्हे तर शासकीय निवासस्थानाचा वीज व पाणीपुरवठा सलग चार ते पाच दिवस बंद करून अमानवी मानसिक छळ करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. आपल्या नेमणुकीच्या दवाखान्याचा ताबा मिळावा यासाठी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही दखल घेण्यात आली नाही. उलट,डॉ. भगत यांच्या सांगण्यावरून आरोग्य सेविका कविता कोहळेकर व गायत्री उपराळे यांनी आपल्याविरोधात खोट्या व द्वेषपूर्ण तक्रारी दाखल केल्याचा आरोप डॉ.शिल्पा वानखडे यांनी केला आहे. त्या तक्रारीच्या आधारे कोणतेही ठोस कारण नसताना तब्बल नऊ वेळा सुनावण्या घेऊन आपल्याला जाणीवपूर्वक एकटे पाडण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणाबाबत तालुका वैद्यकीय अधिकारी तिलोत्तमा वानखडे यांना वारंवार माहिती देऊनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याशिवाय, गावकऱ्यांना भडकवून सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ व अपमान करून आत्मसन्माना ला ठेच पोहोचविण्यात आल्याचेही अर्जात स्पष्टपणे नमूद आहे.या सर्व अन्यायकारक, असह्य व अमानवी छळामुळे माझ्या आत्मसन्मानापेक्षा कोणतेही पद मोठे नाही, अशी ठाम भूमिका घेत डॉ. शिल्पा वानखडे यांनी आपल्या वैद्यकीय अधिकारी पदाचा राजीनामा सादर केला आहे. या घटनेमुळे धारणी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य व्यवस्थेतील अंतर्गत कारभार, महिला अधिकाऱ्यांची सुरक्षितता आणि प्रशासकीय उदासीनता यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, जिल्हा प्रशासन या प्रकरणाची गंभीर दखल घेते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सीईओंनीही ऐकली नाही कैफियत

राजीनामा देण्यापूर्वी डॉ. शिल्पा वानखडे यांनी आपल्या वडिलांसह संजिता महापात्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्याकडे कैफियत मांडली. मात्र महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांची बाजू ऐकून न घेता त्यांनाच दोषी ठरवले. डॉ. धम्मदीप भगत यांची ब्राम्हणवाडा थडी येथील बालमृत्यू प्रकरणात शिक्षा म्हणून नऊ महिन्यांसाठी मेळघाटात बदली करण्यात आली होती; मात्र तीन वर्षे उलटूनही त्यांनी बैरागड आरोग्य केंद्रातच ठाण मांडल्याचा आरोप करण्यात येतो. त्यांच्या कार्यकाळात बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढल्याचेही नमूद आहे. अशा अधिकाऱ्यांची बाजू घेऊन प्रामाणिक सेवा देणाऱ्या महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. शिल्पा वानखडे यांचे मनोबल वाढविण्याऐवजी त्यांनाच दोषी ठरवण्यात आल्याचा आरोप या प्रकरणातून पुढे आला आहे.

# निर्भीड भूमिकेमुळे सागर सवळेंना धमक्या

## अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न ऐरणीवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ चांदुर बाजार**



चांदूर बाजार तालुक्यात परीक्षा केंद्र ऐनवेळी बदलल्याच्या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवाज उठवणारे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघचे केंद्रीय प्रसिद्धी प्रमुख तथा पत्रकार सागर सवळे यांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे पत्रकार संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली असून संबंधितांवर तातडीने कारवाईची मागणी करण्यात येत आहे.घटनेची पार्श्वभूमी अशी की, शिरजगाव बंड येथे अवघ्या २ किलोमीटर अंतरावर असलेले परीक्षा केंद्र ऐनवेळी बदलून १६ किलोमीटर दूर अडगाव येथे निश्चित करण्यात आले. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना अतिरिक्त प्रवास, खर्च व मानसिक ताण सहन करावा लागू नये, या उद्देशाने सवळे यांनी ही बाब वृत्तपत्रातून मांडली होती. बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी त्यांनी संबंधित शाळा प्रशासनाशी तसेच अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वस्तुस्थिती जाणून घेतल्याचे सांगितले आहे.मात्र काही विद्यार्थ्यांचे पेपर अपेक्षेप्रमाणे न गेल्याने गैरसमज निर्माण झाला. त्यानंतर सुमारे २० ते २५ विद्यार्थी व काही पालकांनी सवळे यांच्या घरी जाऊन शिवीगाळ, दबाव व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप आहे. हा प्रकार अत्यंत निंदनीय असून लोकशाही मूल्यांना धक्का देणारा असल्याची प्रतिक्रिया विविध पत्रकार संघटनांनी दिली आहे.पत्रकार हा समाजाचा जागरूक प्रहरी असून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हे त्याचे कर्तव्य आहे. मतभेद असू शकतात; परंतु ते संवादातून सोडवले जावेत, धमक्यांद्वारे नव्हे, असे मत संघटनांनी व्यक्त केले. सवळे यांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून प्रकरणाचा तपास सुरू आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेची हमी देत निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने

# प्रशासनाची तयारी विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८बुलढाणा–** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या नियोजित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर यंत्रणा सज्ज झाली असून, सुरक्षा आणि नियोजनाच्या दृष्टीने व्यापक तयारी सुरू आहे. या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी आज दौऱ्याशी संबंधित ठिकाणांची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या.



जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग यांनी राष्ट्रपतींच्या आगमनापूर्वी सुरक्षा व्यवस्थेची बहुस्तरीय तपासणी करण्यात येत आहे. सभास्थळ, हेलिपॅड, विश्रांतीगृह तसेच मार्गावरील संवेदनशील ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षा आराखड्याचा आढावा घेण्यात आला. बॉम्ब शोधक पथक, श्वान पथक, तसेच दंगल नियंत्रण पथक तैनात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.यावेळी पोलीस अधीक्षक सुधीर तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्रेणीक लोढा, आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. आशितोष गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग आणि इतर संबंधित विभागांच्या अधिकारी उपस्थित होते. वाहतूक व्यवस्थापन, आपत्कालीन आराखडा, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता व प्रोटोकॉल पालन याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या.पोलीस महानिरीक्षक यांनी सुरक्षा यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना देत, कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. राष्ट्रपतींचा दौरा सुरळीत व यशस्वी पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले.

## महसूल-भूमी अभिलेखांच्या संयुक्त कारवाईत

# तरोडा-आष्टोली पाणंद रस्ता अखेर मोकळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती–** तरोडा ते आष्टोली दरम्यान अनेक वर्षांपासून बंद असलेला पाणंद रस्ता अखेर महसूल विभाग व भूमी अभिलेख विभागाच्या संयुक्त कारवाईत पोलीस बंदोबस्तात मोकळा करण्यात आला. रस्त्याचे माती काम व खडीकरण यापूर्वीच करण्यात आले होते; मात्र काही शेतकऱ्यांनी मातीकाम झालेला भाग बुजवून पेरणी केली तसेच उर्वरित मार्ग अडवल्याने काम अपूर्ण राहिले होते. परिणामी परिसरातील शेतकऱ्यांची वाहतूक अडचणीत आली होती.या संदर्भात आष्टोली येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार, मोर्शी यांच्याकडे तक्रार केली होती. तक्रारीची दखल घेत महसूल विभागाने भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करून सीमांकन केले. त्यानंतर पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण हटवून रस्ता खुला करण्यात आला. कारवाईदरम्यान काही शेतकऱ्यांनी वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला; मात्र शिरखेड पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत कारवाई सुरळीत पार पाडली.राज्य शासनाच्या 'शेत/पाणंद रस्ते' योजनेअंतर्गत तसेच 'मातोश्री ग्रामसमृद्धी'सारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील रस्ते कायमस्वरूपी सक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे.




रस्ता मोकळा झाल्याने तरोडा व आष्टोली येथील शेतकऱ्यांची वाहतूक समस्या दूर झाली असून शेती मशागत व शेतमाल वेळेत बाजारपेठेत पोहोचविणे सुलभ झाले आहे.कारवाईवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी-कर्मचारी, भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी, मंडळाधिकारी, तलाठी, पोलीस पाटील तसेच स्थानिक प्रशासन उपस्थित होते. वादग्रस्त प्रश्न निकाली निघाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पोलीस आयुक्तालयातील पाच अधिकाऱ्यांच्या बदल्या

## गाडगेनगरचे ठाणेदार गोरखनाथ जाधव, अतुल वर विशेष शाखेत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८अमरावती**

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी मंगळवारी आयुक्तालयातील पाच अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून यामध्ये कल्याण शाखेचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांची गाडगेनगर पौलीस स्टेशन येथे बदली करण्यात आली. तर गाडगेनगरचे ठाणेदार अतुल वर यांची विशेष शाखेत बदली करण्यात आली आहे.पोलीस आयुक्त राकेश ओलायांनी आतापर्यंत दोन क्राईम मिटींग घेत शहराचा आढवा घेतला होता. तसेच काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. त्यांनी मंगळवारी आयुक्तालयातील पाच अधिकाऱ्यांचा बदल्या केल्या आहेत. यामध्ये कल्याण शाखेचे गोरखनाथ जाधव यांची गाडगेनगर पोलीस स्टशेनला बदली करण्यात आली. तर गाडगेनगर ठाण्याचे ठाणेदार अतुल वर यांची विशेष शाखेत बदली




करण्यातआली. विशेष शाखेचे निलेश करे यांची कल्याण शाखा, पोलीस उपनिरीक्षक सागर ठाकरे यांची नियंत्रण कक्षातून गाडगेनगर पोलीस स्टेशन आणि पोलीस उपनिरीक्षक गणेश राऊत यांची नियंत्रण कक्षातून नांदगावपेठ पोलीस स्टेशन येथे बदली करण्यात आली आहे. तसेच दोन दिवसानंतर अन्य काही अधिकाऱ्यांच्यासुध्दा बदल्या होणार असल्याची माहिती आहे.

# जिल्ह्यात उत्सवांच्या काळात ध्वनीक्षेपकांना रात्री १२ पर्यंत मुभा

## जिल्हाधिकाऱ्यांचे १५ दिवसांच्या शिथिलतेचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

आगामी विविध सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील नागरिका साठी प्रशासनाने मोठा दिलासा दिला आहे. जिल्ह्यात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापरासाठी वर्षभरातील एकूण १५ दिवसांची विशेष शिथिलता देण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहेत. केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम २०१७ मधील तरतुदींचा आधार घेत ही परवानगी देण्यात आली आहे. या आदेशानुसार, निश्चित केलेल्या उत्सवांच्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरता येणार आहे. एरव्ही रात्री १० वाजेपर्यंत असलेली ही मर्यादा आता काही विशेष दिवसांसाठी वाढवण्यात आली आहे. ज्या उत्सवांसाठी ही सवलत लागू असेल त्यात प्रामुख्याने १९ फेब्रुवारी रोजीची शिवजयंती, २६ मार्चला श्रीराम नवमी, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनाचा समावेश



आहे. तसेच वर्षाच्या उत्तरार्धात ४ सप्टेंबरला श्रीकृष्ण जयंती, १४ सप्टेंबरला गणपती उत्सव, २५ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी आणि १५ ऑक्टोबरला नवरात्र पंचमीसाठी ही सूट असेल. नवरात्रीचे मुख्य दोन दिवस म्हणजे १९ व २० ऑक्टोबर, तसेच



दिवाळीमध्ये ६ नोव्हेंबरला धनत्रयोदशी आणि ८ नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाच्या दिवशीही रात्री १२ पर्यंत ध्वनीक्षेपक सुरू ठेवता येतील. वर्षाच्या शेवटी २५ डिसेंबर (नाताळ) आणि ३१ डिसेंबर रोजीही ही सवलत लागू राहील. मात्र, ही शिथिलता देताना जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी काही कडक अटीही घातल्या आहेत. झोननिहाय ठरवून दिलेली ध्वनी मर्यादा कोणत्याही परिस्थितीत ओलांडता येणार नाही. विशेषतः रुणालय, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांसारख्या 'शांतता क्षेत्र' घोषित परिसरात ही सवलत लागू असणार नाही. नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित आयोजक आणि यंत्रणेवर राहील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी आणि उत्सव मंडळांनी प्रशासकीय नियमांचे पालन करून उत्सव शांततेत साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# श्री अंबादेवी संस्थान तर्फे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री अंबादेवी मंदिर येथे आज श्री अंबादेवी संस्थानच्या वतीने अमरावती महानगरपालिकेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यामध्ये अमरावती महानगर पालिकेचे नवनियुक्त महापौर मा. श्रीचंदजी तेजवानी, उपमहापौर मा. सचिनजी भेंडे तसेच गटनेते मा. चेतनभाऊ गावंडे यांचा आई जगदंबेचा प्रसाद, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.संस्थेचे उपाध्यक्ष किशोर भाऊ बेंद्रे व सचिव डॉ. जयंत पांढरीकर यांच्या हस्ते महापौर व उपमहापौरांचा सत्कार करण्यात आला. तसेच गटनेते चेतनभाऊ गावंडे यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त



अशोकजी खंडेलवाल यांच्या हस्ते करण्यात आला. मंदिर परिसरात धार्मिक व मंगलमय वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.सत्कारानंतर महापौर श्रीचंदजी तेजवानी यांनी आपल्या मनोगतात श्री अंबादेवी संस्थानच्या कार्याचे कौतुक करत, संस्थेच्या विकासात्मक व धार्मिक उपक्रमांसाठी महानगरपालिकेच्या स्तरावरून आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची ग्वाही दिली. संस्थानच्या कोणत्याही कामात मी कुठेही कमी पडणार नाही, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.उपमहापौर सचिनजी भेंडे यांनीही संस्थेला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देत मंदिर परिसर स्वच्छ, सुशोभित व व्यवस्थित राहील याकडे विशेष लक्ष देण्यात येईल, असे सांगितले. गटनेते चेतनभाऊ गावंडे यांनीही आपल्या मनोगतात संस्थेच्या सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदविण्याची भूमिका व्यक्त केली.कार्यक्रमाचे प्रभावी संचालन संस्थेच्या विश्वस्त सौ. मीनाताई पाठक यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जयंत पांढरीकर यांनी मानले.या प्रसंगी संस्थेचे विश्वस्त सौ. मीनाताई पाठक, विलासभाऊ मराठे, किशोरभाऊ बेंद्रे, डॉ. जयंत पांढरीकर, अशोकजी खंडेलवाल, ॲड. दिपकजी श्रीमाळी तसेच व्यवस्थापक आप्पाजी कोल्हे यांच्यासह संस्थेचा सेवेकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमामुळे मंदिर परिसरात उत्साहाचे व भक्तीभावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## अवैध सावकार यांनी केलेल्या अत्याचाराचा उलगडा होण्यासाठी

# शक्तीसिंह वीरेंद्रसिंह दिक्षित व सुमंत अरविंद पाटील यांची नार्को टेस्ट करा

## माजी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८दर्यापूर**

शक्तीसिंह वीरेंद्रसिंह दिक्षित व सुमंत अरविंद पाटील या अवैध सावकार यांच्या घरी उपनिबंधक कार्यालय अमरावती मधील कर्मचारी यांनी धाड टाकून अवैज , संशयास्पद कागदपत्रे जप्त करण्यात आले होते त्यानुसार त्यांनी अमरावती जिह्या मधील ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचे दिसून येत आहे त्यावरूनच त्याचे दोन वर्षाचे फोन पे बँक अकाउंट चेक करावे त्याच्या फॅमिली च्या नावाने व्याजाचे बरेच पैसे आले आहेत ते पण चेक करावे नोटरी करुन कोरे चेक घेऊन मित्राच्या नावाने चेक बाउंस करुन अश्या अनेक केसेस यांनी केल्या आहेत त्याची चौकशी



करावी त्यांचे नेटवर्क असलेले कारंजा,अकोला, बुलढाना व अमरावती जिल्ह्यामध्ये यांची प्रॉपर्टी ची चौकशी करावी चेक देणाऱ्या घरच्याचे घेतलेले सोन दागिने चेक करा घेणारा व देणारा या दोघांची नार्को टेस्ट घ्या त्या मध्ये किती लोकांवर यांनी अन्याय केले आणि व्याजासाठी अजून काय काय अन्याय केले समोर येईल यांना रोड टच जमीन दोन एकर ६ लाख मध्ये कशी भेटते ही चौकशी करा वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे निःपक्ष पणे चौकशी करुन गुन्हा दाखल करावा याच्या मध्ये गुंतलेल्या लोकांना धमक्या देऊन प्रकरण निपटवण्याचा यांचा प्रयत्न चालू आहे यांना कस्टडी मध्ये घेऊन चौकशी व्हावी अशी आग्रहाची मागणी माजी जिल्हाप्रमुख शिवसेना अमरावती गोपाल पाटील अरबट यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कडे केली आहे आता जिल्हाधिकारी आता काय निर्णय घेणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे व हे निवेदन पोलिस अधीक्षक ग्रामीण यांना सुद्धा देण्यात आले आहे.

# विदर्भासाठी संशोधन व नवोपक्रमाचे नवे पर्व; 'व्हि जी राईज सेंटर'चे उद्घाटन

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेत नव्या उपक्रमाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन येथे उभारण्यात आलेल्या 'व्हि जी राईज सेंटर'चा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटात व उत्साहात पार पडला. संशोधन,नवोपक्रम, कौशल्य विकास व उद्योजकता यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणारे हे केंद्र विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी नवे पर्व ठरणार असल्याचे मत व्यक्त करून मान्यवरांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेत आता नव्या उपक्रमास सुरुवात झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल असे सांगितले.श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित स्व वसंतराव गुलालकरी राईज (ठखडए) सेंटरच्या उद्घाटन समारंभ छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून डॉ. माधव जी. लाभे, उद्घाटक म्हणून डॉ. यशवंत काटपातळ , विशेष अतिथी म्हणून समित सिंघई



तसेच हरीश मोहोड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले व कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे,स्वीकृत सदस्य डॉ. अमोल महल्ले, दानदाते प्रशांत गुलालकरी,प्राचार्य डॉ. जी. आर.गोसावी हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, प्रत्यक्ष अनुभव, प्रकल्पाधारित शिक्षण व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे, हा या केंद्राचा मुख्य हेतू आहे.व्हि जी राईज म्हणजे रिसर्च, इनोव्हेशन, स्किलिंग व एंटरप्रेन्युअरशिप. या चार स्तंभांवर आधारित एकात्मिक परिसंस्था येथे विकसित करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आयओटी, रोबोटिक्स, इलेक्ट्रिक व्हेईकल, स्मार्ट ॲग्रीकल्चर, स्मार्ट हेल्थकेअर आदी क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी सेंटरच्या माध्यमातून मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन व नवोपक्रम प्रयोगशाळा, प्रोटोटाइप विकासासाठी स्वतंत्र सुविधा, स्टार्टअपसाठी को-वर्किंग स्पेस तसेच सेमिनार हॉल्स, मीटिंग रूम इ. अत्याधुनिक पायाभूत सुविधा येथे उपलब्ध असणार आहे. विविध संस्थांमधील आंतरशाखीय संशोधन व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे सुमित सिंघई यांनी सांगितले.सेंटरबाबत बोलताना प्रशांत गुलालकारी यांनी सांगितले की, विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या संधींसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, या उद्देशाने राईज सेंटरची संकल्पना मांडली. शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी कमी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगारनिर्माते बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्या वडिलांच्या वसंतराव गुलालकरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे केंद्र सुरू केल्याचे सांगत त्यांनी मूल्याधिष्ठित शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि प्रादेशिक विकास यावर भर दिला.व्हि जी राईज सेंटरमुळे विदर्भात संशोधन संस्कृतीला चालना मिळेल, स्थानिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधले जातील. युवक, महिला व वंचित घटकांसाठी नवी संधी निर्माण होईल, अशी अपेक्षा डॉ.यशवंत काटपातळ यांनी व्यक्त केली. शासकीय उपक्रम, स्टार्टअप इंडिया व आत्मनिर्भर भारत यांसारख्या धोरणांना पूरक ठरणारे प्रकल्प येथे विकसित होणार असल्याचे हरीश मोहोड यांनी आपल्या भाषणातून सांगितले. 'योग्य वातावरण व मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या कल्पना संशोधनात, स्टार्टअपमध्ये व सामाजिक परिवर्तनात रूपांतरित होऊ शकतात,' असा विश्वास माधव लाभे यांनी यावेळी व्यक्त केला.व्हि जी राईज सेंटर डॉ. पंजाबराव देशमुख पॉलिटेक्निक येथे सुरू झाल्यामुळे भविष्यात विदर्भाच्या शैक्षणिक व औद्योगिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, अशी अपेक्षा हर्षवर्धन देशमुख यांनी यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली.प्राचार्य डॉ जी.आर गोसावी यांनी स्वागत पर भाषण केले. संचालन प्रा.अभिजीत खोने,यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.प्रशांत ठाकरे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थे चे आजीव सभासद विविध महाविद्यालयाचे प्राचार्य मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चांदूर बाजार येथे तालुकास्तरीय महिला भजन स्पर्धा

# नागरिकांचे प्रबोधन हे किर्तन, भजनामधून शक्य



## बबलू देशमुख यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८चांदूर बाजार**

जतन करा गावसंस्कृती, होऊ द्या भजने जनजागृती'' या संदेशातून तालुक्यातील महिला शक्तीला व्यासपीठ उपलब्ध करून देणारी भव्य महिला भजन स्पर्धा मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी संगेकर सभागृह येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे आयोजन अनिरुद्ध उर्फ बबलूभाऊ देशमुख यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. या कार्यक्रमाला बाळासाहेब अलोने, प्रतापराव किटुकले, अरविंदराव लंगोटे, किरणताई बबलूभाऊ देशमुख आदींची उपस्थिती होती.

संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांच्या भजन, किर्तनातुन जनजागृतीचे काम झाले आहे. आज या भजन स्पर्धच्या माध्यमातुन हि परंपरा कायम ठेवल्या गेली आहे. असे प्रतिपादन यावेळी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केले. तालुक्यातील विविध गावांमधील महिला भजन मंडळांनी पारंपरिक वेशभूषेत, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तीभावाने ओतप्रोत सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेमध्ये प्रत्येक मंडळाने दोन भजने सादर केली. त्यापैकी एक भजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अनिवार्य ठेवण्यात आले होते. अभंग, भारूड, गौळण व पोवाड्यांच्या माध्यमातून संत परंपरेचा जागर झाला.

स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध गायक व परीक्षक श्री. गोपाल सालोडकर, श्री. पराग पदवाड व श्री. अमर वांखडे यांनी केले. वेशभूषा, स्वरांची सुसंगती, तालबद्धता, सादरीकरण शैली आणि आशय यावर आधारित गुणांकन करण्यात आले. प्रथम क्रमांकास ११,०००, द्वितीय ७,००० व तृतीय ५,००० अशी रोख बक्षिसे देण्यात आली. चतुर्थ ते पंधराव्या क्रमांकापर्यंत मृदंग भेट देऊन गौरव करण्यात आला. तसेच बक्षीसपात्र नसलेल्या सर्व सहभागी मंडळांना ७०० प्रोत्साहनपर मानधन व प्रत्येक सदस्यास प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान गावसंस्कृती जपण्याचा व महिलांमध्ये अध्यात्मिक जाणीव वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला. तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिला भजन मंडळांना उत्स्फूर्त दाद दिली.

या उपक्रमामुळे चांदूर बाजार तालुक्यात भक्ती, संस्कृती आणि महिला सक्षमीकरणाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. किशोरराव देशमुख, राजेंद्र भाऊ खापरे,छोटू देशमुख,भाई देशमुख,भास्करराव हिरडे,पंकज कडू,भोला मदने,राहुल वाटाणे,विलास शेकार,सचिन हिवराळे,योगेश इसळ, गजानन देशमुख,राजाभाऊ धनसांडे, मनोज देशमुख,पंकज नेहारे, मनीष वाघमारे,सचिन धर्माळे,मंगेश देशमुख,पल्लवीताई वाटाणे, उत्कर्ष देशमुख,अंकुश धाकडे,श्रेयस बरवे,शंतनु फुलझेले,निलेश डांगे,संविधान मोहोड, भूषण देशमुख, प्रीतम मानापूरे,शाहू बोंडे, नकुल देशमुख,आदित्य देशमुख, अभिजीत सावरकर,सोपान पोहोकर, भावेश साखरे,नरेंद्र हिवे, यांचा सहभाग होता

# क्लच वायरच्या फासात अडकून बिबट्याचा मृत्यू

## वन विभागाने दिले स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अचलपूर**

अचलपूर तहसील अंतर्गत निजामपूर परिसरात मृतावस्थेत आढळलेल्या नर बिबट्याच्या मृत्यूबाबत वन विभागाने बिबट्याच्या मृत्यूची कारणे स्पष्ट केली आहेत. प्राप्त माहितीनुसार, शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजता निजामपूर परिसरातील विदर्भपाटबंधारे विकास महामंडळाच्या ई-क्लास क्षेत्रात एक नर बिबट्या मृत अवस्थेत आढळून आला. वन विभागाच्या पथकाने परिसर ताब्यात घेऊन पंचनामा व प्राथमिक तपासाची प्रक्रिया सुरू केली. वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पशुवैद्यकीय अधिकारी, टी.टी.सी. सिपना वन्यजीव, परतवाडा तसेच पशुसंवर्धन विभागाच्या



अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मृत बिबट्याची तपासणी करण्यात आली. तपासादरम्यान बिबट्याचे सर्व अवयव सुरक्षित आढळून आले. त्यामुळे अवैध शिकारीचा प्राथमिक संशय नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र शवविच्छेदन (पोस्टमार्टम) दरम्यान बिबट्याच्या मानेत क्लच वायरचा फास अडकलेला आढळून आला. प्राथमिक वैद्यकीय अहवालानुसार याच फासात अडकून बिबट्याचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. निर्धारित प्रक्रियेनुसार परतवाडा येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरमध्ये शवविच्छेदन व मृत बिबट्याचा अंतिम संस्कार करण्यात आला. वन विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत वनगुन्हा नोंदवला असून पुढील सखोल तपास सुरू केला आहे. तपासात कोणतीही निष्काळजीपणा किंवा अवैध कृती आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# अधिकाऱ्याला मारहाणप्रकरणी तीन वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

महावितरण विभागाच्या अधिकाऱ्याला मारहाण प्रकरणात येथील जिल्हा सत्र न्यायाधीश सचिन एस. पाटील यांनी आरोपीला तीन वर्ष सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त करावासाची शिक्षा सुनावली आहे. बंडू पुंडलीकराव आठवले (वय ३७ रा. महाजनपुरा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

दोषारोपपत्रानुसार बुधवारा बुधवा येथील महावितरण कार्यालयातील सहायक अभियंता निखील वसंतराव राऊत हे ६ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी बिल थकबाकीबाबत महाजनपुरा येथे समज देण्याकरिता गेले होते. दरम्यान त्यांनी बंडू आठवले यालासुध्दा समज दिली होती. तेव्हा बंडू आठवले यांनी सहायकअभियंता राऊत यांना शिवीगाळ करीत मारहाण केली आणि शासकीय



कामात अडथळा निर्माण केला. घटनेनंतर लगेच राऊत यांनी खोलापुरीगेट ठाण्यात तक्रार दिली असता पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सदर प्रकरणात तपास अधिकाऱ्यांनी सखोल तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकार पक्षातर्फे साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकूनै न्यायाधीश सचिन एस. पाटील यांनी आरोपीला तीन वर्ष सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात अतिरिक्त शासकिय अभियोक्ता ॲड. शशीकिरण भगवतीप्रसाद पलोड यांनी सरकारच्या वतीने बाजू मांडली.

# सुवर्णकाराला लुटणाऱ्या टोळीतील सात आरोपींना २१ पर्यंत पोलीस कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-** सुवर्णकाराला लुटणाऱ्या टोळीतील सातही आरोपींना न्यायालयाने २१ फेब्रुवारीपर्यंत पो लीस कोठडी सुनावली आहे. सैयद इम्रान सैयद मिर उर्फ दबंग, फिरोज खान कासम खान, शेख इम्रान उर्फ इम्मु शेख रहेमान, शेख रिझवान उर्फ कालू अब्दुल रहेमान, शुभम उर्फ बंटी ज्ञानेश्वर खंडारे, आणि सुरज सिध्दार्थ तायडे अशी अटकेतील लुटारुंची नावे आहेत. :

सुशांत शेरेकर यांचे कठोरा मार्गावरील सुमित्रा ज्वेलर्स नावाने दुकान आहे आणि ते दुकानापासून काही अंतरावर असलेल्या बालाजीनगरात राहतात. १.३ फेब्रुवारी राजी शेरेकर ९ वाजताच्या सुमारास दुकान बंद करून दुचाकीने घरी जात असताना अनोळखी लुटारूंनी त्यांना अडवून चाकूचा धाक दाखवून त्याच्या ताब्यातील १ करोड ५ लाखांचे सोन्याचे दागिने हिसकावून पसार झाले होते. या घटनेत गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल



करून लुटारुंचा शोध सुरू केला. तसेच गुन्हे शाखेचे पथक सुध्दा समांतर तपास करीत होते. रविवारी दुपारी गुन्हे शाखेच्या पथकाला एका आरोपीचा सुगावा लागताच त्याला ताब्यात घेवून कसून चौकशी केली असता त्याने सहा साथीदारांच्या मदतीने गुन्हा केल्याचे कबुल केले.

लगेच पोलिसांनी सातही लुटारुंना अटक करून लुटलेला सर्व मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले वाहन आणि तीन चाकू असा एकूण १ कोटी १० लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सोमवारी सर्वांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २१ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे पोलीस सर्वांची कसून चौकशी करीत आहेत.

### पाच किलो एमडी ड्रग्जचे प्रकरण

# डीआरएच्या पथकाकडून चित्रिकरणात घटनास्थळाचा पंचनामा

## बडनेऱ्याच्या एका व्यक्तीला समज दिल्याची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-**

डीआरएच्या पथकाने गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत काही दिवसा आधी पाच किलो एमडी ड्रग्जसह चार आरोपींना अटक केली होती. या प्रकरणात डीआरएचे पथक मंगळवारी शहरात दाखल झाले आणि त्यांनी घटनास्थळाचा चित्रिकरणात पंचनामा केला. तसेच त्यांनी बडनेरा येथील एका व्यक्तीला चौकशीकरिता हजर राहण्याचा समज दिल्याची माहिती आहे. डीआरएच्या पथकाने १ फेब्रुवारी रोजी नावसारी ते रिंगरोड मार्गावरील एका ढाब्यासमोरून चार युवकांना अटक करून त्यांच्या ताब्यातून ५ किलो एमडी ड्रग्ज जप्त केली होती. त्यानंतर त्यांची कसून चौकशी केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी चौघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. तेव्हापासून चारही आरोपी अमरावती कारागृहात आहेत. त्या चौघांनी दिलेल्या माहितीवरून डीआरएच्या पथकाने बडनेरा मार्गावरील दोन व्यक्तीची, त्यानंतर अकोला येथील एका व्यक्तीची माहिती घेतल्यानंतर अधिकारी नागपूरला निघून गेले. मंगळवारी डीआरएचे एक पथक अमरावतीला आले आणि संपूर्ण घटनास्थळाचा चित्रिकरणात पंचनामा केला, तसेच या प्रकरणात अधिकाऱ्यांनी बडनेरा येथील एका व्यक्तीला चौकशी करीता हजर राहण्याची समज सुध्दा दिल्याची माहिती आहे.

# मेळघाटात वाघाच्या जबड्यातून शेतकऱ्याचा थरारक बचाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धारणी-** मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या सिपना वन्यजीव अभयारण्य परिसरात पुन्हा एकदा पट्टेदार वाघाच्या हल्ल्याने भीतीचे सावट दाटले आहे. रायपूर व्याघ्र परिक्षेत्रातील रेहट्याखेडा येथील शेतकरी मुन्ना झापू जामूनकर (वय ४३) यांच्यावर सोमवारी सायंकाळी वाघाने अचानक झडप घालत जीवघेणा हल्ला केला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांच्यावर उपचार सुरू असून ते मृत्यूशी झुंज देत आहेत.सोमवारी सायंकाळी ६ ते ७ वाजताच्या सुमारास जामूनकर हे आपल्या शेतात पिकांची राखण करत होते. संध्याकाळच्या अंधुक प्रकाशात दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्या अंगावर झेप घेतली. वाघाच्या तीक्ष्ण पंजांचे फटके आणि जबड्याच्या पकडीमुळे ते क्षणार्धात रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. त्यांच्या आरडाओरडीनंतर ग्रामस्थांनी जीव धोक्यात घालून धाव घेतली आणि मोठ्या प्रयत्नांनी वाघाला पळवून लावत जामूनकर यांची सुटका

## रेहट्याखेडा येथे रक्तरंजित हल्ला



केली.जखमी अवस्थेत त्यांना तातडीने सेमाडोह येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथील प्राथमिक उपचारांनंतर अधिक उपचारासाठी त्यांना अमरावती येथील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालय इर्विन येथे हलविण्यात आले. त्यांच्या डोक्याला, हाताला व पाठीवर गंभीर जखमा झाल्या असून वैद्यकीय पथक त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे.दरम्यान, या घटनेमुळे परिसरात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. सिपना जंगलालगतच्या गावांमध्ये वाघ, बिबटे व अस्वल यांचा वाढता वावर नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. गेल्या दोन वर्षांत याच पट्टेदार वाघाने आठ नागरिकांचा बळी घेतल्याच्या घटना घडल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.घटनेचा प्राथमिक अहवाल महसूल प्रशासनाकडून तहसील कार्यालयात सादर करण्यात आला आहे. संबंधित परिसरात वनविभागाने तातडीने गस्त वाढवून वाघाचा मागोवा घेणे, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

मुन्ना जामूनकर मृत्यूच्या दारातून परतले असले तरी त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. संपूर्ण मेळघाट त्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करत असताना मानव-वन्यजीव संघर्षाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जंगलाचा राजा आणि जंगलालगत राहणारा माणूस यांच्यातील संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

# चार पोलीस निलंबित

## न्यायाधीशांच्या घरी चोरीचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८ अमरावती**

कांतानगर परिसरातील एकाच रात्री पाच न्यायाधीश व चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानी धाडसी चोरीप्रकरणी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी चार कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करून त्यांची चौकशी सुरू केली आहे. सचिन भोयर, प्रमोद हरणे, अथर बेग आणि अभिषेक दिक्षीत अशी निलंबित पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत.कांतानगर परिसरात न्यायाधीश व न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे तसेच विभागीय आयुक्तांसह जिल्हाधिकारी व अन्य अधिकाऱ्यांचे शासकीय निवासस्थान आहेत. दिवस-रात्र या परिसरात पोलीस अधिकाऱ्यांसह वर्दळ असते. कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर न्यायाधीशांच्या बंगल्यावर पोलिसांची तैनाती असते. तरीसुध्दा शनिवारी मध्यरात्री पाच न्यायाधीश व चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या घरी चोरट्यांनी चोरी



केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. त्यामुळे पोलीस वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली होती. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून चोरट्यांचा शोध सुरु केला. चोरी करतांना चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसत सुध्दा आहेत परंतु पोलिसांच्या हाती काही लागले नाही. पोलीस तैनात असतांना न्यायाधीश व न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या घरी चोरी कशी झाली, याबाबत पोलीस आयुक्तांनी संपूर्ण माहिती घेतल्यानंतर चार कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. आयुक्तांच्या या कारवाईमुळे पोलीस वर्तुळात चांगलीच खडबळ उडाली आहे.

## मजुराच्या हक्कांसाठी लढा : 'मनरेगा बचाव अभियान'ला प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८ चिखलदरा-** चिखलदरा तालुक्यातील बिहाली गावात मनरेगा बचाव अभियान' अंतर्गत त्यस्थांसोबत महत्त्वपूर्ण चर्चा पार पडली.ग्रामीण भागातील रोजगार हमी देवारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण गोजगार हमी योजना (मनरेगा) अधिक प्रभावीपणे राबविणे आणि मजुरांच्या हक्कांचे संरक्षण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. यावेळी अमरावती जिल्हा युवक कॉंग्रेसचे जिलाध्यक्ष राहुल येवले यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. रोजगार उपलब्धतेतील अडचणी,कामांच्या मंजुरीतील विलंब तसेच मजुरी थकबाकी यांसंदर्भात ग्रामस्थांनी आपली मते मांडली. यावेळी येवले यांनी आगामी 'मनरेगा बचाव आंदोलन'ची रूपरेषा स्पष्ट करत सर्व ग्रामस्थांना आपल्या हक्कांसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. ग्रामीण मजुरांचा रोजगार आणि हक्क अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे त्यांनी सांगितले. या बैठकीस तालुकाध्यक्ष कॉंग्रेस कमिटी चिखलदरा सहदेव बेलकर तसेच गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. अभियानास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी

# कर्जमाफीसाठी प्रहारची तहसीलवर धडक : सह्यांची मोहीम जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८तिवसा**

महाराष्ट्रासह देशातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून अस्मानी आणि सुलतानी संकटाचा दुहेरी फटका सहन करत असून, नैसर्गिक आपत्ती, अपुरे दर आणि कर्जाच्या ओझ्यामुळे आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे खचला आहे. या पृष्ठभूमीवर सर्व शेतकर्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या तिवसा तालुका कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलमार्फत निवेदन सादर केले. तसेच या मागणीसाठी तिवसा तालुक्यात व्यापक सह्यांची मोहीम राबविण्याची घोषणा करण्यात आली.

प्रहारचे नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वात राज्यभर सुरू असलेल्या कर्जमाफी आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर तिवसा तालुक्यातही आंदोलन तीव्र करण्यात येत आहे. शेतकर्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी रायगडाच्या पायथ्याशी तीन दिवस उपोषण, आमदारांच्या घरासमोर टेंभा आंदोलन, रक्तदान आंदोलन, मोझरी येथे सात दिवस अन्नत्याग आंदोलन, शेकडो मैलांची पायी वारी आणि नागपूर येथे चक्काजाम आंदोलन असे विविध आंदोलनात्मक उपक्रम राबविण्यात आले होते.

यंदाच्या हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस आणि तूर यांसारख्या प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेक शेतकर्यांचा उत्पादन खर्चही निघाला नाही. ज्या शेतकर्यांचे पीक आले, त्यांनाही बाजारात हमीभाव मिळाला नसल्याने कमी दरात शेतमाल विकण्याची वेळ आली. त्यामुळे कर्ज फेडणे तर दूरच, दैनंदिन खर्च, शिक्षण आणि आरोग्याच्या गरजा भागविणेही कठीण झाले आहे.

आश्वासनांची आठवण करून देत आंदोलन विधानसभा निवडणुकीदरम्यान सत्तेत आल्यानंतर सरसकट कर्जमाफी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसल्याने शेतकर्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही मंत्र्यांनी चारचाकी वाहन किंवा शेतात घर असलेल्या शेतकर्यांना कर्जमाफी नाकारण्याचे संकेत दिल्याने शेतकर्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

प्रहार कार्यकर्त्यांनी यावर तीव्र आक्षेप घेत, शेतात शेती उपयोगासाठी बांधलेली खोली किंवा काटकसर करून घेतलेली चारचाकी गाडी ही कर्जमाफी नाकारण्याचे कारण ठरू नये, अशी भूमिका मांडली. शेतकरीही आधुनिक सुविधा वापरण्याचा हक्कदार आहे, असे त्यांनी नमूद केले. शेतकर्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी शासनावर दबाव निर्माण करण्याच्या उद्देशाने तिवसा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सह्यांची मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रहारच्या कार्यकर्त्यांनी दिली.


# मजीप्राची भरती परीक्षा पुढे ढकलली

## खासदार बोंडे यांचे प्रयत्न फळाला : अन्य परीक्षांमुळे होती मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) भरती प्रक्रियेतील परीक्षा केंद्र व दिनांक नियोजनाबाबत विद्यार्थ्यांच्या तक्रारी होत्या. खासदार अनिल बोंडे यांनी ही बाब परीक्षार्थींच्या विनंतीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांच्या लक्षात आणून दिली. त्यांनी दखल घेऊन मजीप्राला निर्देश दिले. त्यानुसार २५,२६,२७ फेब्रुवारीच्या सदर परीक्षा पुढे लढकलण्याचा निर्णय मजीप्राने घेतला आहे. पुढील तारखा निश्चित झाल्यावर कळविण्यात येणार असल्याचे मजीप्राचे मुख्य प्रशासकीय अधिकारी गजानन गुरव यांनी कळविले आहे.

मजीप्रा भरती प्रक्रिया आयबीपीएसमार्फत आयोजित करण्यात आली होती. या परीक्षा केंद्रांचे वाटप व परीक्षा दिनांकांच्या नियोजनामध्ये अनेक गंभीर अडचणी विद्यार्थ्यांनी खा. बोंडे यांच्या निदर्शनास आणून दिल्या. विद्यार्थ्यांच्या निवेदनानुसार,



फेब्रुवारीत विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय महत्त्वाच्या परीक्षांचे दिनांक एकाच दिवशी येत आहेत. त्यामध्ये रेल्वे भरती परीक्षा २५ फेब्रुवारी, इसरो व्हीएसएससी परीक्षा २६ फेब्रुवारी, नाशिक महानगरपालिका परीक्षा २४ व २९ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण परीक्षा २५, २६ व २७ फेब्रुवारी तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग (कौशल्य चाचणी) २६ व २७ फेब्रुवारीला आहे. अशा अनेक परीक्षांचे वेळापत्रक जवळजवळ एकाच कालावधीत आल्यामुळे उमेदवारांपुढे गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. अनेक विद्यार्थ्यांना एकाच दिवशी किंवा सलग दिवसांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी परीक्षा द्याव्या लागत असून, परीक्षा निवडीचा कठीण निर्णय घ्यावा लागत आहे. अनेक उमेदवारांनी विविध संस्थांच्या परीक्षांसाठी अर्ज केलेले असल्याने दिनांकांच्या संघर्षामुळे त्यांना समान संधी मिळत नाही. याचा थेट परिणाम स्पर्धा परीक्षेच्या पारदर्शकतेवर व गुणवत्तेवर होण्याची शक्यता आहे. दूरवरच्या परीक्षा केंद्रांमुळे प्रवास, निवास, आर्थिक खर्च व मानसिक ताण यामध्ये मोठी वाढ होत आहे. ही भरती प्रक्रिया हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असल्याने त्यामध्ये न्याय्य, सुयोग्य व विद्यार्थीहिताचा दृष्टिकोन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करण्याची विनंती त्यांनी केली होती. त्यानुसार खा. बोंडे यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविले. त्याची दखल घेऊन मजीप्राच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहे. महापारेषण व मजीप्रा परीक्षेसंदर्भातल्या अन्य काही अडणींवर चर्चा करण्यासाठी खा. बोंडे आज बुधवार रोजी मुख्यमंत्र्यांना मुंबईत भेटणार आहे.

# बोगस डॉक्टरच्या क्लिनिकवर छापा; औषधसाठा केला जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या पथकाने बडनेरातील नवी वस्ती परिसरातील एका क्लिनिक वर धाड टाकून बोगस डॉक्टरचा पर्दाफाश केला. क्लिनिकमधून मोठ्या प्रमाणात औषघसाठा जप्त करण्यात आला. ही कारवाई रात्री करण्यात आली. या प्रकरणी मंगळवारी बडनेरा ठाण्यात बोगस डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

इंद्रजीत श्रीरामजी सरकार (३७, रा. नवी वस्ती, बडनेरा) असे गुन्हा ज्ञाखल करण्यात आलेल्या बोगस डॉक्टरचे नाव आहे. इंद्रजीत सरकार याचे नवी वस्ती परिसरातील एका मशिदीजवळ श्रीराम क्लिनिक आहे.कोणतेही वैद्यकीय शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र नसतानाही - इंद्रजीत सरकार हा - क्लिनिकमध्ये नागरिकांकडून पैसे या घेऊन त्यांच्यावर उपचार



करीत होता. याबाबत महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे तक्रार प्राप्त झाली होती. तक्रारीच्या अनुषंगाने शहरी आरोग्य केंद्र, बडनेरा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद इमरान शाह वल्द रशीद शाह (४०) रा. अन्सारनगर, अमरावती यांच्या नेतृत्वातील पथकाने साडेनऊच्या सुमारास सापळा रचून इंद्रजीत सरकारच्या श्रीराम क्लिनिक वर धाड टाकली. त्यावेळी तो नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांच्यावर उपचार करीत पथकाने असल्याचे आढळून आले. सोमवारी रात्री प्रमाणपत्र त्याला वैद्यकीय व क्लिनिकच्या परवान्याबाबत विचारणा केली. आले नाही. क्लिनिकच्या पाहणीत मात्र, त्याच्याकडे ते आढळून तो औषधसाठा पथकाने जप्त तेथे औषधसाठा आढळून आला. अधिकारी डॉ. मोहम्मद इमरान केला. या प्रकरणी वैद्यकीय शाह यांच्या तक्रारीवरून बडनेरा गुन्हा दाखल करण्यात आला. ठाण्यात इंद्रजीत सरकारविरुद्ध पुढील तपास सुरु असल्याचे सांगण्यात आले.

# जिल्हा परिषदेचे १४ अधिकारी आज तालुक्यात

## पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार सर्वत्र जनता दरबार भरणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, आज, बुधवार, १८ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यातील चौदाही तालुक्यांमध्ये जनता दरबार आयोजित करण्यात येणार आहे. या जनता दरबारासाठी जिल्हा परिषदेच्या प्रत्येक तालुक्यात एका वरिष्ठ अधिकाऱ्याला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी चौदा वरिष्ठाधिकाऱ्यांना याबाबत आदेश दिले आहेत.

या आदेशानुसार, तिवसा येथे अतिरिक्त सीईओ विनय ठमके, अचलपूर येथे डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, धामणगाव रेल्वे येथे पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, चिखलदरा येथे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, दर्यापूर येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले तर अमरावती येथे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी जनता दरबारात उपस्थित राहतील.

याशिवाय, धारणी येथे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी



अभियंता सुनील जाधव, भातकुली येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिल्पा पवार, वरुड येथे शिक्षणाधिकारी सतीश मुगल, मोर्शी येथे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रिया देशमुख, चांदूर रेल्वे येथे कृषी अधिकारी मला तोडकर, नांदगाव खंडेश्वर येथे महिला व बालविकास विभागाचे डेप्युटी सीईओ विलास मरसाळे आणि अंजनगाव सुर्जी येथे पंचायत विभागाचे सहायक गटविकास अधिकारी सुनील गवई हे देखील जनता दरबाराला उपस्थित राहणार आहेत. तिवसा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे हे देखील उपस्थित असतील. दरम्यान, स्वतः सीईओ काही ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष कामकाजाची माहिती घेणार आहेत.

गेल्या काही दिवसांत झालेल्या निवडणुकांमुळे आचारसंहिता लागू होती, परिणामी जनता दरबार भरवता आले नव्हते. आचारसंहितेच्या काळात नागरिकांच्या कामांपेक्षा निवडणुकांसंबंधी कामांना प्राधान्य देण्यात आले होते. यामुळे तक्रारींची संख्या वाढल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी २८ जानेवारी रोजी झालेल्या डीपीसी बैठकीत जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांनी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन जनता दरबार भरवण्याचे निर्देश दिले होते. या दरबारांना महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित राहणार असून, संबंधित तहसीलदार हे दरबार आयोजित करतील.

# महागाव येथील नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सुनंदा सुरोशे पायउतार

## १२ विरुद्ध शून्य मतांनी अविश्वास ठराव झाला पारित



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८यवतमाळ**

येथील नगर पंचायतीत चार वर्षाच्या सत्ताकाळात दुसऱ्यांदा राजकीय उलटफेर झाला. कॉंग्रेस महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष सुनंदा सुरोशे कोपरकर यांच्या विरोधात नगर सेवकांनी दाखल केलेला अविश्वास प्रस्ताव बारा विरुद्ध शुन्य मतांनी पारित झाला. त्यामुळे नगराध्यक्षांना पायउतार व्हावे लागले आहे. गटनेते शैलेश सुरोशे कोपरकर यांनी आईचे नगराध्यक्षपद वाचविण्यासाठी पराकोटीचा आटापिटा केला परंतू त्यांना अखेर तोंडघशी पडावे लागले.

नगराध्यक्षांविरोधात अविश्वास प्रस्तावावर मतदान होण्यापूर्वी नगर पंचायत सभागृहाच्या परिसरात शक्तीप्रदर्शन करण्यासाठी दोन्ही गटांचे समर्थक उपस्थित होते. त्यामुळे तणावाची स्थिती होती मात्र अखेर कोपरकर गटाने समोर पराभव अटळ असल्याचे दिसताच सभागृहातून काढता पाय घेतला. कॉंग्रेस गटनेते शैलेश सुरोशे कोपरकर यांच्या कारभारामुळे विरोधक त्रस्त होतेच परंतु सत्तेत कॉंग्रेस सोबत असलेल्या नगरसेवकांचा विश्वासही कोपरकर यांनी गमावला होता.

शिवसेना जिल्हा प्रमुखांची शिष्टाई झाली असफल महाविकास आघाडीचा घटक असलेल्या शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख तथा महागाव न.पं चे उपाध्यक्ष प्रमोद उर्फ शाका भरवाडे यांनीच पक्षादेश खुंटीला टांगून महविकास आघाडी गोत्यात आणली. त्यांची समजूत काढण्यासाठी सेनेचे जिल्हा प्रमुख प्रविण शिंदे आणि राजेंद्र गायकवाड स्वतः न.प सभागृहाबाहेर तळ ठोकून होते. पर्यटनाला गेलेल्या नगरसेवकांची ट्रॅव्हल्स येताच त्यांनी प्रमोद भरवाडे यांचे ब्रेन वॉशिंग करण्याचा प्रयत्न केला परंतू 'माझ्या कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न आहे' असे उत्तर देत प्रमोद भरवाडे यांनी वरिष्ठांना निरुत्तर केले व सभागृहात जाऊन मतदान केले.

# अमरावतीत 'दिशा' समितीची आढावा बैठक

## ३१ मनपा शाळांवर सौरऊर्जेसाठी निधीची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

अमरावती येथे जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची विस्तृत आढावा बैठक आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित या बैठकीस लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीच्या अध्यक्षस्थानी खासदार बलवंत वानखडे होते. यावेळी आमदार गजानन लवटे, आमदार प्रविण तायडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र तसेच महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची उपस्थिती होती. विविध विभागांचे अधिकारी व संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधीही सभेत सहभागी झाले होते.सभेदरम्यान नवनिर्वाचित महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी अमरावती महानगरपालिका शाळांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याचा महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला. मनपा अंतर्गत एकूण ६३ शाळांपैकी ३२ शाळांवर सोलर पॅनेल बसविण्यात आले असून उर्वरित ३१ शाळांवर अद्याप सौरऊर्जा प्रणाली बसविणे बाकी आहे. या शाळांवर सोलर बसविण्यासाठी नियोजन विभागाकडून स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.महापौरांनी सांगितले की, सौरऊर्जा प्रकल्पांमुळे शाळांचा वीज खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल आणि पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेल. विद्यार्थ्यांमध्ये नूतनीकरणीय ऊर्जेबाबत जागरूकता निर्माण होऊन स्वच्छ आणि हरित अमरावती या संकल्पनेला बळकटी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.महापौरांच्या प्रस्तावावर अध्यक्ष खासदार वानखडे यांनी सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिले. संबंधित विभागांना सविस्तर तांत्रिक व आर्थिक अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.बैठकीदरम्यान नवनिर्वाचित महापौरांचा सत्कार करून त्यांना समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देण्यात आली. सभेचा समारोप सकारात्मक वातावरणात झाला.

# शिवपिंड-नंदीच्या शोभायात्रेनंतर विधिवत विवाह सोहळा

## महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने भक्तिमय वातावरण

## भोलेश्वर महादेव मंदिरात शंकर-पार्वती विवाह



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

बुधवारा जुनी टाकसाळ येथील भोलेश्वर संस्थान परिसरात भोलेश्वर आरती मंडळाच्या वतीने हळदी संगीत उत्सवाचा पारंपारिक आणि आधुनिकतेची सांगड घालणारा अनोखा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात झाला. महिलांच्या सक्रिय सहभागातून साजऱ्या झालेल्या या सोहळ्याने मंदिर परिसरात भक्ती संस्कृती आणि स्त्रिशक्तीचा प्रेरणादायी संगम अनुभवायला मिळाला. सोहळ्याची सुरुवात पारंपारिक वेशभूषेत सजलेल्या महिलांच्या मिरवणुकीने झाली. पिवळ्यावस्त्रांसह आकर्षक साड्या परिधान करून महिलांनी मंदिर परिसरातुन शिवपिंड आणि नंदीमुर्तीची शोभायात्रा काढली. ढोल ताशांच्या निनाद, जयघोष आणि पारंपारिक गीताच्या स्वरात ही मिरवणुक शिवपिंड-नंदीच्या शोभायात्रेनंतर विधीवत विवाह सोहळा महिलांच्या उत्स्फुर्त सहभागाने भक्तिमय वातावरण होते.भक्तिमय वातावरणात पार पडली. त्यानंतर शिव-पार्वती विवाह सोहळा पारंपारिक पद्धतीने संपन्न करण्यात आला. या हळदी-संगीत उत्सवात महिलांनी पारंपारिक नृत्य, मंगलगीत आणि धार्मिक विधीमध्ये उत्स्फुर्तसहभाग नोंदवत स्त्रीशक्तीचे दर्शन घडविले, आधुनिक पद्धतीची मांडणी आणि पारंपारिक संस्कृतीचा संगम यामुळे हा सोहळा उपस्थितांसाठी विशेष आकर्षक ठरला. पतंगराय परिवाराने तीनपिढ्यांची केलेली सेवा निश्चित प्रेरणादायी आहे. मागील अनेक वर्षापासुन राज पतंगरा व यश पतंगराय, सोनु गुजर, अभिषेक गुजरे, अमित शिंगणे, आशिष पुरोहित, विकास गायकवाड, रोहित वानखडे, ऋषिकेश गाढवे, जगदिश पतंगराय, पंकज गडकरी, रवि पारवे, संतोष रावेकर, नरेच उचाडे, लोकेश पेठकर, संजय तंवर रामभक्त, संजय पारवे हनुमान भक्त, अभिषेक दांडवे, भावेश घायर, अलोक काळे, ओम देशपांडे, राजु पवार, पंजाब पारवे, - तुषार अक्जेकर, जयेश कवटकर, यश शिंगणे, वेदांत अवजेकर, मंथन खंडारे, चैतन्य खंडारे आदींनी न परिश्रम घेतले.

# मराठी शाळा वाचविण्यासाठी २५ ला एआयएसएफ रस्त्यांवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्याथ्र्यांच्या घरापासून १ किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा, ३ किलोमीटरच्या आत उच्च प्राथमिक शाळा तर ५ किलोमीटरच्या आत माध्यमिक शाळा असणे बंधनकारक आहे. तरीसुद्धा हा कायदा मोडून आजचे सरकार २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करीत आहे. या धोरणाविरुद्ध ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशनने (एआयएसएफ) आगामी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाची हाक दिली आहे. या आंदोलनाचे नेतृत्व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. कैलास चव्हाण, एआयएसएफच्या राज्य सचिव प्रतीक्षा ढोके, इतर पदाधिकारी धीरज बनकर, सुप्रिया राऊत, दीप सावळे करणार आहेत. या आंदोलनात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# प्रवाशांसाठी आनंदवार्ता

## बडनेरा-नाशिक मेमूला मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे विशेष गाड्यांची वेळ वाढवून त्यांना विशेष गाड्या, होळी विशेष आणि उन्हाळी विशेष गाड्या म्हणून चालवणार आहे. रेल्वेच्या एकूण विशेष सेवांची संख्या वाढवण्यात आली असून अमरावतीकर प्रवाशांसाठी गाडी क्र. ०१२११ बडनेरा – नाशिक दैनिक विशेष (१३७ फेऱ्या) तर गाडी क्र. ०१२११ नाशिक–बडनेरा (१३७ फेऱ्या) अशा एकूण २७४ फेऱ्या करणार आहे. त्यामुळे अमरावती व बडनेरा येथील प्रवाशांना संत नगरी शेगांव, भुसावळ आणि नाशिक येथे जाणाऱ्या भाविकांसाठी विशेष सोय झाली आहे. प्रथमच या मेमूचा संपूर्ण उन्हाळ्यासाठी कालावधी वाढवण्यात आला आहे.



**सर्व रेल्वेस्थानकांवर थांबा**

ही मेमू वेगाने धावते तसेच मार्गातील सर्वच स्टेशनवर थांबा घेते. मुर्तिजापूर, अकोला, शेगांव, जलंब, नांदुरा, मलकापूर अशा लहान स्टेशनवरही थांबा घेत असल्यामुळे उन्हाळ्यात कोणत्याही कामानिमित्त प्रवाशांना जायचे असल्यास या अनारक्षित मेमूचा वापर करता येईल. कारण, अमरावती व बडनेरा स्थानकावरून सकाळी १० वाजताच्या सुमारास शेगांव, भुसावळकडे निघणारी एकही रेल्वे गाडी नाही. त्यामुळे ही मेमू संतनगरी शेगावकडे जाण्यासाठी तर फारच उपयोगाची आहे. शेगांवला ही मेमू गाडी सकाळी ११.३३ वाजता पोहोचते. त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी ही वेळ सोधीची आहे. त्याचप्रमाणे भुसावळ येथे दुपारी ३.०५ वाजता पोहोचते. त्यानंतर नाशिक रोड येथे रात्री ७०५ पर्यंत पोहोचत असल्याने त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी ही गाडी सोयीची आहे.

**अमरावती स्थानकावरून सुटते**

ही मेमू गाडी अमरावती रेल्वे स्थानकावरून सकाळी ९ ते ९.३० दरम्यान निघते. बडनेरा–नाशिक मेमू असे या गाडीचे नाव असले तरी ही अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकावर दुरुस्ती, देखरेख, स्वच्छता तसेच पाणी भरण्यासाठी रोज येत असते. तसेच मेमूचे चालकही अमरावती येथूनच स्वार होतात. त्यामुळे अमरावती स्टेशनवरूनच ही मेमू सकाळी ९ ते ९.३० दरम्यान बडनेराच्या दिशेने निघते. प्रवाशांना याची माहितीच नसल्याने अमराब्दी येथील अनेक प्रवासी हे बडनेरा येथे खासगी वाहनाने किंवा शहर बसने जातात व तेथून या रेल्वे गाडीत बसतात. कारण, ट्रेनला बडनेरा स्टेशनवर पोहोचण्यासाठी १५ मिनिटे लागतात. या मेमूमधून प्रवास करण्यासाठी अमरावती रेल्वेस्थानकावरून देखील बसता येते. या मेमू गाडीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद आहे. ही मेमू गाडी अमरावती रेल्वेस्थानकावरून कायमस्वरूपी सुरू करण्यात यावी, अशी प्रवाशांची मागणी आहे.

# छत्री तलाव प्रकल्प वेळेत व दर्जेदार पूर्ण करा

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज शहरातील महत्त्वाकांक्षी छत्री तलाव प्रकल्पाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कामांचा सविस्तर आढावा घेतला. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पाची प्रगती, कामाची गुणवत्ता व निर्धारित वेळापत्रक यांची त्यांनी तपशीलवार पाहणी केली.पाहणीदरम्यान संबंधित विभागांचे अधिकारी, अभियंते व कंत्राटदार प्रतिनिधी उपस्थित होते. तलाव परिसरात सुरू असलेल्या सुशोभीकरण कामांची, पायाभूत सुविधांच्या उभारणीची तसेच पर्यावरणपूरक उपाययोजनांची माहिती आयुक्तांनी घेतली. पादचारी मार्ग, आकर्षक प्रकाशयोजना, हरित पट्टा, बसण्याची व्यवस्था,



सुरक्षात्मक कठडे आणि स्वच्छता यांसारख्या कामांची बारकाईने तपासणी करण्यात आली.कामाचा दर्जा अबाधित राखण्याबाबत आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले. दर्जाबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे ठामपणे सांगत सर्व कामे तांत्रिक मानकांनुसार उच्च गुणवत्तेची पूर्ण करावीत, असे आदेश त्यांनी दिले. तसेच निर्धारित मुदतीत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामाचा वेग वाढवून अनावश्यक विलंब टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या.नागरिक व कामगारांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्याचे निर्देश देताना आयुक्तांनी तलाव परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे व सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याबाबतही सूचना दिल्या. परिसर आकर्षक, स्वच्छ व पर्यावरणपूरक ठेवण्यावर भर देण्यात आला. प्रकल्पाच्या प्रगतीचा साप्ताहिक आढावा घेऊन सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.छत्री तलाव प्रकल्पामुळे शहराच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार असून नागरिकांना आरोग्यदायी वातावरणात विरंगुळ्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. सकाळी व सायंकाळी फिरण्यासाठी सुरक्षित पादचारी मार्ग, स्वच्छ पाणी व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.पाहणीदरम्यान आयुक्तांनी तलावातील ऐतिहासिक 'छत्री'च्या सौंदर्यवर्धनासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची कबुली दिली. ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपत आधुनिक पद्धतीने विकास करण्यात यावा, असे त्यांनी नमूद केले.या वेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, योगेश पिठे, शहर अभियंता रविंद्र पवार आदी अधिकारी उपस्थित होते. अमरावती महानगरपालिका शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असून छत्री तलाव प्रकल्प वेळेत व दर्जेदार पूर्ण करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

# आता म्हातारपणाची चिंता सोडा

## दरमहा मिळणार तीन हजार रुपये पेन्शन

### असंघटित कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना ठरणार फायदेशीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने 'प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना' (पीएमएसवायएमवाय) राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नोंदणी करणाऱ्या कामगारांना वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर दरमहा तीन हजार रुपये पेन्शन मिळणार असून, जास्तीत जास्त कामगारांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त यांनी केले आहे.



जिल्ह्यातील कष्टकरी, शेतमजूर आणि असंघटित कामगारांना वृद्धापकाळात आर्थिक आधार मिळावा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. १८ ते ४० वयोगटातील पात्र कामगारांनी आपल्या जवळच्या नागरी सुविधा केंद्रात (सीएससी) जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे.१८ ते ४० वर्षे वयोगटातील पुरुष व स्त्री कामगार या योजनेसाठी पात्र आहेत. त्यांचे मासिक उत्पन्न १५ हजार रुपयांपेक्षा कमी असावे, कामगार हा आयकर भरणारा नसावा, ईपीएफओ, ईएसआयसी किंवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा (एनपीएस) सदस्य नसावा.

**योजनेचे फायदे आणि पेन्शनचे स्वरूप**


या योजनेत लाभार्थ्याला त्याच्या वयानुसार ५५ ते २०० रुपयांपर्यंत मासिक अंशदान भरावे लागेल. वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर संबंधित कामगाराला दरमहा तीन हजार रुपये निश्चित पेन्शन मिळेल. लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या पती किंवा पत्नीला पेन्शनच्या ५० टक्के रक्कम म्हणजेच दीड हजार रुपये कौटुंबिक पेन्शन दिली जाईल. विशेष म्हणजे, एखाद्या लाभार्थ्याला योजनेतून बाहेर पडायचे असल्यास, त्याने जमा केलेली रक्कम व्याजासह परत मिळण्याची तरतूदही यात आहे.

**कागदपत्रे आवश्यक**

नोंदणी करण्यासाठी लाभार्थ्याकडे आधारकार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाइल क्रमांक आणि राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक असणे अनिवार्य आहे. पहिल्या महिन्याचे अंशदान नागरी सुविधा केंद्रावर रोखीने भरावे लागेल, त्यानंतर सिस्टिमद्वारे पेन्शन खाते क्रमांक जारी केला जाईल. लाभार्थ्यांनी वेळीच अर्ज करून द्यावा.

# वाढत्या प्रखर उन्हात ई-वाहनांची कसोटी, तुमचे इलेक्ट्रिक वाहन सुरक्षित आहे का?

### बॅटरी 'ओव्हरहिटिंग'चा धोका रेंजवरही होतोय परिणाम; ई-वाहनधारकांनो काळजी घ्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्ह्याच्या तापमानाचा पारा सध्या ३२ अंशांच्या पार जात आहे. अशा कडक उन्हाचा सर्वाधिक फटका इलेक्ट्रिक वाहनांना बसत असल्याचे दिसून येत आहे. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरामुळे अनेकांनी ई-वाहनांकडे मोर्चा वळवला असला, तरी उन्हाळ्यात या वाहनांची बॅटरी आणि कार्यक्षमता टिकवणे हे मोठे आव्हान ठरत आहे. ई-वाहनांमधील लिथियम आयन बॅटरी उष्णतेप्रती अत्यंत संवेदनशील असते, त्यामुळे उन्हाळ्यात निष्काळजीपणा केल्यास मोठी दुर्घटना घडू शकते.

वाहन कडक उन्हात उभे करू नका. सावलीत किंवा कव्हर घालून पार्क करा. टायर्समधील हवेचा दाब योग्य ठेवा. कमी हवेमुळे बॅटरीवर जास्त ताण पडतो. त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे.

**चार्जिंग करताना या बाबी कटाक्षाने लक्षात ठेवा**

प्रवास करून आल्यावर लगेच वाहन चार्जिंगला लावू नका. बॅटरी थोडी थंड झाल्यावरच प्लग इन करा.दुपारी १२ ते ४ या वेळेत ऊन कडक असते, या काळात चार्जिंग करणे राळलेले उत्तम.नेहमी कंपनीने दिलेल्या अधिकृत चार्जिंग सेंटरवरच वापर करा.

**उन्हाचा ई–वाहनांवर परिणाम नेमका काय?**

अतिउष्णतेमुळे बॅटरीमधील रासायनिक प्रक्रिया वेगाने होते. यामुळे बॅटरी लवकर गरम होऊन 'थर्मल रनवे'ची स्थिती निर्माण होऊ शकते. परिणामी, बॅटरी फुगणे किंवा काही दुर्मीळ प्रसंगी आगीच्या घटना घडू शकतात. तसेच, मोटर आणि कंट्रोलरवर ताण येऊन वाहनाची कार्यक्षमता मंदावते. त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे.

# ५५१ ग्रामपंचायतींत प्रभाग रचनेचा कार्यक्रम; दिवाळीत निवडणुकांची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्ह्यात मुदत संपलेल्या ५५१ ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणुकांच्या दृष्टीने हालचालींना वेग आला असून शासनाने प्रभागरचनेची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासक नियुक्तीबाबतचा प्रश्न अद्याप न्यायालयात प्रलंबित असतानाच ग्रामविकास विभागाने निवडणूकपूर्व तयारीला प्रारंभ केला आहे. ग्रामविकास विभागाच्या सहसचिवांनी मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी यासंदर्भात पत्र जारी केल्याने जिल्हा प्रशासनात लगबग वाढली आहे.या पार्श्वभूमीवर उपजिल्हाधिकारी (निवडणूक) ज्ञानेश घ्यार यांनी सर्व तहसीलदारांना पत्र पाठवून २० फेब्रुवारीपासून प्रभागरचनेची प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले आहेत. जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी हा कार्यक्रम लागू राहणार आहे. प्रत्यक्षात जिल्ह्यात ११ ते १७ फेब्रुवारीदरम्यान ५५१



ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे, तर उर्वरित कालावधीत आणखी काही ग्रामपंचायतींची मुदत संपणार आहे. त्यामुळे तहसीलस्तरावर आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये सध्या प्रशासकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सरपंचाला प्रशासकपद द्यायचे की विस्तार अधिकाऱ्याची नियुक्ती करायची, हा मुद्दा न्यायालयात प्रलंबित आहे. तोपर्यंत प्रशासकराज कायम राहणार आहे. दरम्यान, निवडणुका तातडीने होण्याची शक्यता कमी असून त्या दिवाळीपर्यंत लांबणीवर पडू शकतात, अशी चर्चा प्रशासनात सुरू आहे.प्रभागरचनेची प्रक्रिया २० फेब्रुवारीपासून सुरू होऊन अंतिम प्रभागरचना ४ मे रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर सरपंच व सदस्यपदांसाठी आरक्षण जाहीर होईल आणि पुढे मतदार यादी अद्ययावत करण्याचा कार्यक्रम राबविला जाईल. जूनपासून पावसाळा सुरू होत असल्याने पुढील चार महिने निवडणूक प्रक्रिया राबविणे कठीण मानले जाते. त्यामुळे ऑक्टोबर–नोव्हेंबरदरम्यान, म्हणजेच दिवाळीच्या सुमारास ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजण्याची शक्यता वर्तविली जात आहे.एकूणच, जिल्ह्यातील ग्रामपंचायत पातळीवरील राजकीय हालचालींना आता वेग येणार असून प्रभागरचना हा निवडणुकीकडे जाणारा पहिला महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

# राष्ट्रीय कला प्रदर्शनीत ॲनिमेशन कॉलजेच्या दोन विद्यार्थिनींना पुरस्कार

### बॉम्बे आर्ट सोसायटीच्या १३४ व्या राष्ट्रीय प्रदर्शनीसाठी निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

कला क्षेत्रातील देशातील सर्वात मोठी संस्था असलेल्या दि बॉम्बे आर्ट सोसायटीच्या १३४ व्या वार्षिक राष्ट्रीय कला प्रदर्शनीसाठी येथील कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोइंजिनिअरींग अँड रिसर्चमधील दोन विद्यार्थिनींच्या चित्रांची निवड झाली असून त्यांना याच प्रदर्शनीसाठी पुरस्कार देखील जाहिर करण्यात आली आहेत. २४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथील जहागीर आर्ट गॅलरी येथे होणाऱ्या कार्यक्रमात या दोन्ही विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात येणार आहे.






अमरावती जिल्हयातील एकमेव ॲनिमेशन महाविद्यालय असलेल्या कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोइंजिनिअरींग अँड रिसर्चमधील विद्यार्थी दरवर्षी राष्ट्रीय चित्रपट महोत्सव तसेच कला प्रदर्शनींमध्ये सहभागी होऊन पारितोषिके मिळवतात. यावर्षी देखील ही परंपरा महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी कायम राखली आहे. २४ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान जहागीर आर्ट गॅलरी येथे सर्व चित्रांची प्रदर्शनी कलाप्रेमींसाठी खुली केली जाणार आहे. देशभरातून दरवर्षी हजारो स्पर्धक, चित्रकार या स्पर्धेत सहभागी होत असतात. त्यापैकी केवळ मोजक्याच चित्रकारांच्या कलाकृतींची निवड यामध्ये होत असते. त्यातून निवडक कलाकृतींना पुरस्कार घोषित केली जातात. त्यामध्ये कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोइंजिनिअरींग अँड रिसर्चमधील कु. अक्षदा कडू आणि कु. आरूषी हिवसे या दोन विद्यार्थिनींच्या कलाकृतींची निवड व पुरस्कार बॉम्बे आर्ट सोसायटीकडून घोषित करण्यात आले आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सुप्रसिद्ध चित्रकार विजय राऊत यांच्या मार्गदर्शनात चित्रकार राजेश वानखडे यांनी या दोन्ही विद्यार्थिनींच्या यशासाठी प्रयत्न केले आहेत. यांच्या अमरावती शहरातील दोन तरूणींनी राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत पारितोषिक मिळविल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केल्या जात आहे.

# अमरावती ग्रामीण पोलिस भरतीत ९९३ उमेदवार शारीरिक चाचणीत उत्तीर्ण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती ग्रामीण पोलीस दलातील भरती प्रक्रियेला वेग आला असून १८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित शारीरिक चाचणीसाठी एकूण २००० उमेदवारांना बोलाविण्यात आले होते. यापैकी १४८८ उमेदवार हजर राहिले, तर ५१२ उमेदवार गैरहजर राहिल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.हजर उमेदवारांपैकी १४११ जणांनी प्रत्यक्ष शारीरिक चाचणीत सहभाग घेतला. एक उमेदवाराने शारीरिक चाचणी दिली नाही. शारीरिक चाचणीनंतर ९९३ उमेदवार उत्तीर्ण झाले असून ४१८ उमेदवार अनुत्तीर्ण ठरले. याशिवाय ७५ उमेदवार शारीरिक मोजमापात अपात्र ठरले, तर कागदपत्र पडताळणीदरम्यान एका उमेदवाराला अपात्र घोषित करण्यात आले.भरती प्रक्रियेदरम्यान मैदानावर कडक पोलीस बंदोबस्त आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध ठेवण्यात आल्या होत्या. उमेदवारांची धाव, गोळाफेक व इतर शारीरिक निकषांनुसार कसून तपासणी करण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, उत्तीर्ण उमेदवारांना पुढील टप्प्यांसाठी लवकरच सूचना देण्यात येणार असून भरती प्रक्रियेतील पुढील वेळापत्रक अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# बळीराजाला चिंतेचे कारण नाही शेततळे योजना ठरणार संजीवनी

### पावसाने ओढ दिली तरी होणार सिंचन

### जिल्ह्यातील कोरडवाहू शेतीला मिळेल नवी दिशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

राज्यातील अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतीला स्थिरता देण्यासाठी सरकारने 'शाश्वत सिंचन शेततळे योजना'ला गती दिली आहे. गडचिरोली जिल्ह्यासारख्या भागात, जिथे पावसाची ओढ लागल्यास पिकांचे मोठे नुकसान होते, तिथे ही योजना शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने आधारवड ठरणार आहे. राज्यभरात या योजनेसाठी मोठा निधी मंजूर करण्यात आला असून, हजारो शेतकरी आता स्वतःच्या शेतात जलसाठा निर्माण करून पीक सुरक्षित करू शकणार आहेत.

एकीकडे नवीन शेततळ्यांचा उत्साह असतानाच, जिल्ह्यातील जुन्या शेततळ्यांच्या दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अनेक जुन्या शेततळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला असून, त्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र अनुदान मिळत नसल्याने ही कामे रखडली आहेत. शासनाने याकडे लक्ष दिल्यास जलसाठवणुकीची क्षमता अधिक वाढू शकते.



**शेतकऱ्याला अनुदान किती मिळणार ?**

या योजनेअंतर्गत शासनाकडून ठराविक आकारमानाच्या शेततळ्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. सध्याच्या निकषानुसार, पात्र लाभार्थ्याला जास्तीत जास्त ७५,००० रुपयांपर्यंत अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाते. हे अनुदान शेततळ्याच्या खोदकामासाठी आणि प्लास्टिक अस्तरीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठर

**बळीराजाला नेमका फायदा कसा ?**

पावसाने ओढ दिल्यास पिकांना संरक्षित पाणी देता येते. पाण्याची उपलब्धता असल्याने शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी फळबागा किंवा भाजीपाला पिके घेऊ शकतो. साठवलेल्या पाण्यामुळे दुसऱ्या हंगामातील पिके घेणे सोपे होते. शेततळयामुळे परिसरातील विहिरींच्या पाणी पातळीतही वाढ होण्यास मदत होते.

**मुख्यमंत्री शाश्वत सिंचन शेततळे योजना काय?**

ही योजना प्रामुख्याने कोरडवाहू शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून न राहता, संरक्षित सिंचन उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. पावसाळ्यात पडणारे जास्तीचे पाणी शेततळ्यात साठवून ठेवले जाते, जेणेकरून पावसाचा खंड पडल्यास किंवा रब्बी हंगामात पिकांना पाणी देता येईल.

**शेतकऱ्यांनी अर्जाची प्रक्रिया करून ठेवावी**

जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. अनिश्चित हवामानावर मात करण्यासाठी शेततळे हे सर्वोत्तम साधन आहे. नवीन अर्जाची प्रक्रिया गतीने राबवली जात आहे. जुन्या शेततळ्यांच्या दुरुस्तीबाबतही शासनाकडे वेळोवेळी प्रस्ताव पाठवले जात आहेत. मंजुरीनंतर त्यांचीही दुरूस्ती केली जाणार आहे, अशी माहिती कृषी अधिकाऱ्यांनी दिली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत